https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!




https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. ४ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ‘पंतप्रधान मोदी कोणाच्याही दबावापुढे झुकणार नाहीत’, ट्रम्प यांच्या ‘टॅरिफ वॉर’वर व्लादिमीर पुतिन यांनी स्पष्टच सांगितलं

**विदर्भ प्रजसत्ताक दि.४नवी दिल्ली**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन दोन दिवसांसाठी भारत दौऱ्यावर आले आहेत. त्यांनी एका मुलाखतीमध्ये भारताचे आणि पंतप्रधान मोदींचे कौतुक केले आहे. पुतिन यांनी टॅरिफवर प्रतिक्रिया दिली. अमेरिका भारतावर शुल्क लादून दबाव आणत आहे का? यावर बोलताना पुतिन म्हणाले, पंतप्रधान मोदी दबावापुढे झुकणारे नाहीत.



रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी हे विधान भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर केले. मुलाखतीत त्यांना दिल्लीत पंतप्रधान मोदींसोबत झालेल्या द्विपक्षीय चर्चेबद्दल आणि भारत–रशिया संबंधांबद्दलच्या त्यांच्या मतांबद्दल विचारण्यात आले.

पुतिन यांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाचे कौतुक केले. जगाने भारताची ठाम भूमिका पाहिली आहे. भारताला त्यांच्या नेतृत्वाचा अभिमान वाटू शकतो. भारत आणि रशियामधील ९० टक्क्यांहून अधिक द्विपक्षीय व्यवहार यशस्वीरित्या पूर्ण झाले आहेत.

भारत–रशिया सहकार्याची व्यापक व्याप्ती पाहता, हा विषय विशेष चर्चेला पात्र आहे. त्यांनी दोन्ही देशांमधील संबंधांचे कौतुकही केले. रशियाचे अध्यक्ष पुतिन आजपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत. ते आज संध्याकाळी नवी दिल्लीत पोहोचतील आणि नंतर पंतप्रधानांच्या निवासस्थानी जातील, तिथे त्यांच्यासाठी खास जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शुक्रवारी, ते २३ व्या वार्षिक भारत–रशिया शिखर परिषदेत सहभागी होतील.

**युरोपने भारताला युद्ध थांबवण्याचे आवाहन केले**

युरोपीय देश भारताला युक्रेन युद्ध संपवण्यासाठी रशियावर दबाव आणण्याचा आग्रह करत आहेत. अमेरिका आणि युरोप भारतावर रशियन तेल खरेदी कमी करण्यासाठी सतत दबाव आणत आहेत, कारण यामुळे पुतिन यांच्या युद्ध यंत्राला निधी मिळतो. तर दुसरीकडे आज जगाचे लक्ष मोदी आणि पुतिन यांच्या भेटीवर आहे.२०२२ मध्ये युद्ध सुरू झाल्यापासून, मोदी आणि पुतिन यांनी १६ वेळा संवाद साधला आहे. २०२२ ते २०२४ दरम्यान ११ वेळा आणि २०२५ मध्ये फक्त पाच वेळा. सप्टेंबर २०२२ मध्ये उझबेकिस्तानमधील समरकंद येथे झालेल्या एससीओ शिखर परिषदेदरम्यान, पंतप्रधान मोदींनी प्रथम पुतिन यांना सांगितले, आज युद्धाचा काळ नाही. जुलै २०२४ मध्ये मॉस्को भेटीदरम्यान, मोदींनी पुनरुच्चार केला, युद्धभूमीवर उपाय सापडत नाहीत.

## पुतीन यांच्या दिल्ली दौऱ्यामुळे फाईव्ह स्टार हॉटेल्सची चांदी, किमान भाडं ८५ हजारांच्या पार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नवी दिल्ली**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांचा दिल्ली दौरा हा देशातील एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. ते स्वतः एका मोठ्या शिष्टमंडळासह येत आहेत. या भेटीमुळे राष्ट्रीय राजधानीतील पंचतारांकित हॉटेल्समध्ये उत्साह निर्माण झालाय. या आठवड्यात खोल्या जवळजवळ भरल्या आहेत आणि दर गगनाला भिडले आहेत.

**यावेळी दिल्लीत अनेक कार्यक्रम**

नोव्हेंबरमध्ये उत्तर भारतात पर्यटन हंगाम सुरू होतो, तेव्हा मोठ्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय प्रवासी येत असतात. याव्यतिरिक्त, या आठवड्यात दिल्लीत अनेक प्रमुख कार्यक्रम होत आहेत, ज्यात भारत मंडपम येथे कर आकारणी बैठक, यशोभूमी येथे पेपर एक्स्पो आणि युनेस्को बैठक यांचा समावेश आहे. लग्नाचा हंगाम देखील सुरू आहे. दरम्यान, टाईम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, या सर्व गोष्टींमुळे आठवड्याच्या शेवटी पंचतारांकित हॉटेल्समध्ये सरासरी खोलीचे दर ८५,००० ते १.३ लाखांपर्यंत वाढले आहेत.

**पुतीन कुठे थांबवणार?**

पुतिन यांच्या निवासाची व्यवस्था दिल्लीतील सुप्रसिद्ध आयटीसी मौर्या हॉटेलमधील ’प्रेसीडेंशियल सुट’ मध्ये करण्यात आली आहे. या सुटला ’चाणक्य सुट’ म्हणूनही ओळखले जाते. याच चाणक्य सुटमध्ये यापूर्वी अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा आणि जो बायडेन यांच्यासारखे ग्लोबल आयकॉनही थांबले आहेत. पुतिन यांच्या सुरक्षेसाठी रशियन सुरक्षा पथक भारतात दाखल झाले असून, त्यांनी या निवासस्थानाची पाहणी पूर्ण केली आहे.

**आयटीसी मौर्या : ४० वर्षांची परंपरा आणि भव्यता**

आयटीसी मौर्या हे हॉटेल गेल्या ४० वर्षांपासून भारत भेटीवर येणाऱ्या राष्ट्राध्यक्षांचे आणि जागतिक नेत्यांचे आवडते ठिकाण राहिले आहे. या हॉटेलमध्ये एकूण ४११ खोल्या आणि २६ सुट्स आहेत. यात बुखारा आणि दम पुख्तसारखे अनेक पुरस्कार विजेते रेस्टॉरंट्स आहेत. भव्य कॉन्फरन्स आणि बँक्वेट व्हिन्यू, उत्कृष्ट वेलनेस सुविधा आणि शाही जेवणाचा अनुभव हे या हॉटेलचे वैशिष्ट्य आहे.

**’चाणक्य सुट’ची शाही ओळख**

राजधानीत २००७ मध्ये या हॉटेलची स्थापना झाली. चंद्रगुप्त मौर्याला सत्ता मिळवून देणारे महान अर्थतज्ज्ञ आणि रणनीतीकार चाणक्य यांचं नाव हॉटेलला देण्यात आलं. ४,६०० चौरस फुटांमध्ये पसरलेला हा सुट त्याच्या अप्रतिम सजावटीसाठी आणि वास्तूशैलीसाठी ओळखला जातो. रेशमी कपड्यांनी सजलेली आर्ट–वॉल्स पाहुण्यांना एका शाही गॅलरीतून चाणक्य यांच्या भव्य मूर्तीकडे घेऊन जातात. या सुटमध्ये मास्टर बेडरूम, वॉक–इन वॉर्डरोब, खाजगी स्टीम रूम, सौना, जिम, १२ आसनांची डाइनिंग रूम, गेस्ट रूम, स्टडी आणि ऑफिस स्पेस यांसारख्या खास सुविधा आहेत. अजीज आणि तैयब मेहता यांसारख्या प्रतिष्ठित कलाकारांच्या दुर्मिळ कलाकृतीही येथे सजवलेल्या आहेत.

**एका रात्रीचा खर्च ८ ते १० लाख रुपये**

या शाही सुविधांचा अनुभव घेण्यासाठी एका दिवसाचा खर्च सुमारे ८ ते १० लाख रुपये आहे. येथे थांबणाऱ्या पाहुण्यांना त्यांच्या इच्छेनुसार जगातील कोणत्याही भागातील विशिष्ट सामग्री वापरून बनवलेली कोणतीही डिश ऑर्डर करण्याचा विशेष विशेषाधिकार मिळतो.

## ‘भांडणं’ विसरा, ‘आघाडी-युती’ मैत्रीशी करा! निवडणुकीचा संपताच ‘प्रेम-शांती’चे मेसेज व्हायरल!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

नगरपालिका निवडणुकीच्या काळात समाजमाध्यमांवर निवडणूक प्रचाराचा ज्वर जोरात होता. आता निवडणूक संपल्यानंतरच्या संदेशांना पूर आला असून ‘आमचा नेता लय भारी, विजयानंतर घेईल भरारी’ यासह निवडणुकीचा ताप आवरण्याची आवाहने होऊ लागली आहेत. ‘संपले इलेक्शन, जपा रिलेशन’ असे प्रेमाचे संदेश मोबाइलवर पोहोचू लागले आहेत.

नगरपालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून विविध पक्षांसह अपक्ष उमेदवाराच्या समर्थकांना मोठा जोर चढला होता. आपल्या नेत्याचे कौतुक करण्यापासून वैयक्तिक टीकेपर्यंत तसेच इतरांचे जमेल तसे वाभाडे काढण्यापर्यंत सगळे प्रकार या काळात झाले. निवडणूक संपल्यानंतरही हा प्रकार कमी झालेला नाही. राजकीय भांडणे थांबविण्याच्या आवाहनापासून ते निवडणूक अंदाजांपर्यंत सगळ्या विषयांचे संदेश आता समाजमाध्यमावर जागा व्यापू लागले आहेत. प्रचाराच्या काळात दिसलेला टीकेचा सूर आणि कडवटपणा मागे ठेवा. निवडणूक संपली आता मैत्रीच्या पक्षात या कारण गेल्या एक महिन्यापासून मित्रांसोबत बंडखोरी झाली होती. आता मित्रांशी आघाडी युती व हेच आपले मैत्रीच राजकारण होय. ‘भांडणं’ विसरा, ‘आघाडी–युती’ मैत्रीशी करा, जिंकला–हरला विसरा! ‘निवडणूक ज्वर’ उतरवून, आता ‘दोस्तीचा डोळा’ मारा! असा सामाजिक व तितकाच प्रबोधनात्मक संदेश



समाजमाध्यमांवर निवडणुकीनंतर व्हायरल होत आहे. निवडणुकीतील विरोध राजकीय होता, व्यक्तिगत नाही. कोणाचे मन दुखावले असेल तर माफी असावी. कारण राजकारण निवडणुकांपुरते असते व मैत्री ही आयुष्यभर साथ देणारी असते, चला, पुन्हा मैत्रीच्या पक्षात प्रवेश करूयात, असे आवाहन करणारे तसेच ‘प्रचार संपला, विरोध संपला’ हे संदेश फिरू लागले आहेत.

**कट्टर कार्यकर्ते पक्षीय अभिनिवेशावर कायम**

कालपर्यंत विविध पक्ष आणि उमेदवारांचे गुणगान करणाऱ्या संदेशांनी ग्रुप भरभरून वाहत होते. मंगळवार सायंकाळीपासून त्यांची जागा समजूतदारीच्या आणि राजकारणाच्या पलीकडे जाणाऱ्या आवाहनांनी घेतल्याचे चित्र समाजमाध्यमांवर दिसले तर अनेक कट्टर कार्यकर्ते मात्र अजूनही पक्षीय अभिनिवेश कवटाळून बसल्याचे दिसून आले.

## १० टोलनाक्यांवर नवीन टोल प्रणाली सुरु

### चाचणीनंतर वर्षभरात देशभर... गडकरींची लोकसभेला माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नवी दिल्ली**

देशातील वाहनचालकांना आणि प्रवाशांना मोठी दिलासा देणारी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी गुरुवारी लोकसभेत केली. गडकरी यांनी सांगितले की, देशातील सध्याची टोल वसुली प्रणाली एका वर्षाच्या आत पूर्णपणे बंद केली जाईल आणि त्याऐवजी नवी इलेक्ट्रॉनिक टोल प्रणाली लागू केली जाईल. या नवीन प्रणालीमुळे महामार्गावर वाहने न थांबता, विनाअडथळा प्रवास करणे शक्य होईल.

नितीन गडकरी यांनी स्पष्ट केले की, हायवे पूर्णपणे डिजिटल करण्याच्या उद्देशाने वाहन थांबवून शुल्क घेण्याची सध्याची पद्धत बंद करण्यात येत आहे. या नवीन तंत्रज्ञानामुळे देशभरातील टोल प्लाझा अदृश्य होतील आणि वाहने टोल भरण्यासाठी न थांबता वेगात पुढे जाऊ शकतील. यामुळे टोलवरील लांब रांगा आणि वेळेची बचत होईल.

सध्याच्या FASTag तंत्रज्ञानावर आधारित ही नवी प्रणाली राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक टोल कलेक्शन (NETC) अंतर्गत नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने विकसित केली आहे. यात आरएफआयडी आधारित फास्टॅग उपकरण वाहनाच्या विंडस्क्रीनवर (समोरच्या काचेवर) लावले जाते. वाहन टोल प्लाझातून जाताना, हे उपकरण थेट चालकाच्या बँक खात्यातून टोलची रक्कम आपोआप कापते. यामुळे रोख व्यवहार किंवा थांबण्याची आवश्यकता भासत नाही.सध्या ही नवीन प्रणाली देशभरातील सुमारे १० ठिकाणी चाचणी आणि देखरेखीसाठी लागू करण्यात आली आहे. पुढील एका वर्षात ती संपूर्ण राष्ट्रीय महामार्ग नेटवर्कवर लागू होण्याची अपेक्षा आहे.

## महाराष्ट्राच्या पीक नुकसानीवर केंद्रीय कृषी मंत्र्यांचे २४ तासांत घुमजाव

### कर्जमाफीसाठी दोन निवेदने मिळाल्याने गोंधळ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नवी दिल्ली**

महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे झालेल्या प्रचंड पीक नुकसानीसाठी राज्य सरकारने केंद्राकडे मदतीसाठी कोणतेही निवेदन पाठवले नसल्याचे विधान केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मंगळवारी संसदेत केले आणि महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर हे घडल्याने, महायुती सरकारला विरोधकांनी धारेवर धरलं. मात्र टीका सुरू होताच आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत सोशल मीडियावर पोस्ट केल्यानंतर, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी बुधवारी २७ नोव्हेंबर रोजी राज्याकडून निवेदन प्राप्त झाल्याचे स्पष्ट करत आपल्या विधानात बदल केला.

टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, राज्याने पीक नुकसानीच्या संदर्भात दोन निवेदन केंद्राकडे पाठवले आहेत. यापैकी एक २७ नोव्हेंबर रोजी आणि दुसरे १ डिसेंबर रोजी पाठवले गेले. राज्याच्या अंदाजानुसार, हे नुकसान जवळपास १०,००० कोटी रुपयांच्या घरात आहे. राज्य सरकारने केंद्राला दिलेल्या निवेदनात १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीतील अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा उल्लेख केला. यानुसार, ८४ लाख हेक्टरवरील पीक नष्ट झाले तर १.१ कोटी शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे.

यापूर्वी ऑक्टोबरमध्ये राज्याचा प्राथमिक अंदाज ६८.७ लाख हेक्टर पीक नष्ट झाल्याचा होता, पण ’पंचनामे’ पूर्ण झाल्यावर नुकसानीची ही व्याप्ती खूप मोठी असल्याचे स्पष्ट झाले. राज्याने दोन निवेदन पाठवले असले तरी, केंद्राकडून मदतीची अंतिम रक्कम निश्चित करण्यापूर्वी केंद्र सरकारसोबत अनेक बैठका आणि चर्चा होतील, असं अधिकाऱ्यांनी म्हटलं.

**राज्याची मदत आणि कर्जाचा मुद्दा**

राज्यातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, पाऊस थांबायला वेळ लागल्याने पंचनामे पूर्ण करण्यास उशीर झाला. मात्र, राज्य सरकारने आतापर्यंत जवळपास १४,००० कोटी रुपयांची मदत वितरित केली आहे. यापूर्वी ऑक्टोबरमध्ये सरकारने ३१,६२८ कोटी रुपयांचे विक्रमी मदत पॅकेज जाहीर केले होते, ज्यात पीक नुकसानीसोबतच पायाभूत सुविधांच्या नुकसानीसाठीही तरतूद करण्यात आली होती.

या घटनेनंतर विरोधी पक्षांनी सत्ताधारी महायुतीला लक्ष्य केले आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी केलेली पोस्ट आणि केंद्रीय मंत्र्यांनी बदललेले विधान, यामुळे केंद्राकडून मदतीचा ओघ सुरू होण्यास होत असलेल्या विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमाफी आणि तातडीच्या मदतीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## झाडाला मिठी मारता, मग बकरीला का नाही? नितेश राणेंचा पर्यावरणप्रेमींना सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

प्रयागराज कुंभमेळ्यानंतर सुमारे दीड वर्षांनी नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीने वेग घेतला असताना, नाशिकच्या तपोवन परिसरात तयार करण्यात येणाऱ्या साधूग्राममुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. साधू–महंतांच्या वास्तव्यासाठी सुमारे ११५० एकर क्षेत्रावर साधूग्राम उभारण्याचे नियोजन आहे, ज्यामध्ये तपोवनमधील ५४ एकर महापालिकेच्या जागेचा समावेश आहे. मात्र याच जागेवरील सुमारे १८०० झाडे तोडण्याच्या नोटिशीमुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विरोधकांनीही यावर आक्षेप घेतल्याने कॅबिनेट मंत्री नितेश राणे पर्यावरण प्रेमींना सवाल विचारला आहे.




नाशिक महानगरपालिकेने तपोवनमधील सुमारे १७०० हून अधिक विविध प्रजातींच्या वृक्षांचे पुनर्रोपण आणि काही फांद्यांची छाटणी करण्याबाबत नोटीस काढून नागरिकांकडून हरकती व सूचना मागवल्या होत्या. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होण्याची शक्यता लक्षात येताच केवळ पर्यावरणप्रेमीच नव्हे, तर सर्वसामान्य नागरिकांनीही शेकडोंच्या संख्येने आक्षेप नोंदवले. या संवेदनशील मुद्द्याने तात्काळ राजकीय वळण घेतले. राज्याचे प्रमुख नेते आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनीही पर्यावरणप्रेमींच्या बाजूने आवाज उचलला. उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि विजय वडेट्टीवार तसेच अजित पवार यांनीही या वृक्षतोडीच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करत पर्यावरणाचे जतन करण्याचे आवाहन केले.

या वादात कॅबिनेट मंत्री नितेश राणे यांनीही उडी घेतली. मात्र, त्यांनी या वादाला वेगळी दिशा देत, झाडाला मिठी मारता तशी बकरीला का मिठी मारत नाही? असा सवाल केला. तसेच आपल्या सणांच्या वेळीच असे प्रश्न उपस्थित केले जातात, असेही नितेश राणे म्हणाले.

बकऱ्यांच्या कत्तलीनंतर रक्ताचे पाणी वाहत असल्याचे अनेकवेळा पाहायला मिळतं. पण तेव्हा पर्यावरणप्रेमी आवाज उठवताना आम्हाला दिसत नाही. व्हर्च्युवल बकरी ईद करा असंही सांगताना दिसत नाही. मग एका धर्माला एक आणि दुसऱ्या धर्माला एक न्याय कशासाठी? झाडाला मिठी मारता चांगली गोष्ट आहे. झाडं जगली पाहिजेत हा पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य मुद्दा आहे. मग झाडाला मिठी मारता तशी बकरीला का मिठी मारत नाही. बकरी प्राणी नाहीये का? तेव्हा प्राणी प्रेमी कुठे असतात हाच माझा प्रश्न आहे. विजय वडेट्टीवार विसरले असतील की ते काँग्रेसचे नेते होण्याआधी हिंदू आहेत. आपल्या सणांच्या वेळी असे प्रश्न विचारले जातात. पण अन्य धर्मांच्या सणांच्या वेळी हे गप्प का? एवढाच प्रश्न विचारला त्यात चूक काय?, असा सवाल नितेश राणेंनी केला.

संपादकीय ......

# निवडणूक आयोग सैरभैर होण्यामागचे कारण काय?

निवडणूक आयोग सध्या काय करत आहे, असा प्रश्न रोज विचारला जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये रोज नवीन ट्विस्ट आणि अपडेट समोर येत आहेत. साधारण आठ वर्षानंतर होत असलेल्या या निवडणुकांमध्ये मतदान होईपर्यंत कुठेही विघ्न आले नाही, असा एकही दिवस गेला नाही. निवडणूक आयोग कोणाच्या ताटाखालचे मांजर झाले आहे, हे वाक्यही आता त्यांच्यासाठी वापरून वापरून गुळगुळीत झाले. दुसरीकडे, १२ राज्यांमध्ये विशेष पुनर्निरीक्षण (एसआयआर) सुरू करून आयोगाने बीएलओंना (घरोघरी जाऊन चाचपणी करणारे कर्मचारी) वेठीस धरले असल्याचा आरोप होत आहे. आयोगाच्या दबावामुळे आतापर्यंत २४ बीएलओंचा एक तर हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला आहे किंवा कामाच्या दबावामुळे त्यांनी आत्महत्या केली. निवडणूक आयोगाने या बीएलओंच्या मृत्यूबद्दल ना ट्विट करत दुःख व्यक्त केले, ना त्यांना श्रद्धांजली वाहिली. मात्र कामातून ब्रेक घेऊन बीएलओ तणावमुक्तीसाठी डान्स करत असल्याचा व्हिडिओ आयोगाने ट्विट केला आहे. निवडणूक आयोगाने व्हिडिओ ट्विट केला म्हटल्याबरोबर तुम्हाला लागलीच आठवलं असेल की याच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटले होते की, 'आम्ही आमच्या आया-बहिणींचे व्हिडिओ सार्वजनिक केले पाहिजे का?' मतदान करतानाचे व्हिडिओ देण्यास यांचा नकार होता, मात्र महिला आणि पुरुष बीएलओ नाचताना तणावमुक्त होतात, असं व्हिडिओ सार्वजनिक करून हे सांगत आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग सैरभैर का झाला आहे, असा प्रश्न पडतो.

महाराष्ट्रात तर राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकीचा जो चिखल करून ठेवला आहे, तो मतदान सुरू असतानाही सावरता आलेला नाही. मतदान सुरू असताना कोर्टाने निकालाची तारीख बदलली. निवडणूक आयोगाने केलेला चिखलच एक प्रकारे कोर्टाने त्यांच्यावरच फेकला. सुरुवातीला २७ टक्के ओबीसी आरक्षणाचा घोळ निवडणूक आयोगाने घातला. त्यामुळे ही निवडणूकच रद्द होण्याची नामुष्की येणार होती. सर्वोच्च न्यायालयाने एवढ्या वर्षांपासून लांबलेल्या निवडणुका आता पुन्हा लांबणीवर टाकणे बरे नव्हे म्हणत आधी निवडणुका घ्या, आणि मग तुम्ही आरक्षणाच्या नावाने जो घोळ घातला आहे तो निस्तरा, असा सज्जड दमच दिला. या निवडणुका झाल्यानंतर जानेवारीमध्ये सर्वोच्च न्यायालय वाढलेले आरक्षण रद्द करणार आणि त्या ठिकाणी पुन्हा निवडणुका घ्याव्या लागणार आहेत. ३ डिसेंबरला जाहीर होणारा नगर परिषद, नगरपंचायतींचा निकाल आता २१ डिसेंबरपर्यंत पुढे गेला आहे. यावर सत्ताधारी आणि विरोधक दोघेही राज्य निवडणूक आयोगावर खवळले आहेत. 'यांची कुठली तरी सेटिंग राहिली असेल, म्हणून निकाल पुढे ढकलले', असे म्हणत सत्ताधारी पक्षाचे निलेश राणे यांनी सर्वसामान्य जनतेच्या मनातील प्रतिक्रिया व्यक्त केली. निलेश राणे यांनी या निवडणुकीत ज्या पद्धतीने निवडणूक अधिकारी, पोलीस आणि भारतीय जनता पक्षाचा बुरखा फाडला आहे, त्यासाठी त्यांचे कौतुकच केले पाहिजे. सत्ता प्रशासनाला कशी वाकवते हे राणेंनी स्टिंग ऑपरेशन करून उघड केले. मालवणमध्ये त्यांनी भाजपच्या पदाधिकार्यांना २५ लाख रुपयांसोबत रंगेहात पकडून दिले तरीही त्यांच्यावर निवडणूक अधिकार्यांनी कारवाई केली नाही, उलट पोलिसांनी निलेश राणेंवरच गुन्हा दाखल केला. आज झालेल्या मतदानावेळीचे राज्यातील जे चित्र समोर आले त्यावरून आपण २१व्या शतकात राहत आहोत की महाराष्ट्रातील प्रत्येक गावागावात चंबळचे डाकू राहतात, असा सवाल निर्माण होत आहे. राज्यातील एकही गाव आणि नगर परिषद, नगरपंचायत अशी राहिली नाही की तिथे हाणामारी झाली नाही. चांद्यापासून बांद्यापर्यंत सर्वत्र बोगस मतदारांचा सुळसुळाट दिसला. शिंदेंचे दोन आमदार तर स्वत:च निवडणूक आचारसंहितेच्या चिंधड्या उडवताना दिसले. आमदार बांगर हे थेट मतदान केंद्रात महिलेला कोणतं बटण दाबायचे याचे 'मार्गदर्शन' करताना दिसले. तिथे उपस्थित असलेल्या निवडणूक कर्मचार्यांनी त्यांच्यावर तात्काळ कोणतीही कारवाई केली नाही. जेव्हा मुख्यमंत्री फडणवीसांनी याबद्दल नाराजी व्यक्त केली, त्यानंतर आयोग जागा झाला आणि कारवाईस सुरुवात केली. संजय गायकवाड यांच्या दिवट्याने लोकांच्या तावडीत सापडलेल्या बोगस मतदाराला पोलिसांकडून सोडवून पळवून लावल्याचे महाराष्ट्राने पाहिले. एकीकडे आयोगाने प्रचारासाठी एक दिवस वाढवून देण्याचा नवा पायंडा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी घालून दिला. त्यामुळे गुलाबराव पाटलांनी म्हटल्याप्रमाणे रात्रभर लक्ष्मीदर्शनाचा योग सरकारमान्य करण्याचे काम आयोगाने केले. त्यासोबतच अचानक निवडणुकीच्या दोन दिवस आधी २४ नगर परिषदांच्या निवडणुका रद्द करून मोठा गोंधळ आयोगाने घातला.

त्यांच्या या निर्णयावर मुख्यमंत्र्यांपासून विरोधी पक्षातील नेत्यांनीही संताप व्यक्त केला. निवडणूक आयोग स्वायत्त आहे, पण खरंच एवढा स्वायत्त आहे का, की तो निवडणुकाच रद्द करू शकेल? या निर्णयामुळे जो गोंधळ निर्माण झाला त्याने संपूर्ण यंत्रणाच वेठीस धरली गेली आहे. एक काळ मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांचा होता, ज्यांनी निवडणुकीला शिस्त लावली. मात्र आता शेषन हे जणूकाही पन्नास वर्षांपूर्वी होऊन गेले की काय, असा कारभार केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोगाचा सुरू आहे. असा गोंधळ पुढील निवडणुकीत घालू नका, असे औरंगाबाद खंडपीठाला ठणकावून सांगावे लागले आहे. अजून महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका बाकी आहेत, तेव्हा तरी हा भोंगळ कारभार चालू नये, एवढी अपेक्षा सामान्य मतदारांची आहे.

# ओव्हरऑल चॅम्पियनशिप मिळविणाऱ्या चमूंचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** छत्रपती संभाजीनगर येथील एमजीएम विद्यापीठात पार पडलेल्या ३९ व्या आंतर विद्यापीठ मध्य विभाग युवा महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संघाने 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप' पटकाविली. या अभूतपूर्व यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते विजयी कलावंत आणि मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला. आगामी काळात चेन्नई येथे होणा-या राष्ट्रीय स्तरावरील युवा महोत्सवातही विद्यापीठाचा संघ आपली विजयाची परंपरा कायम राखेल, असा विश्वास कुलगुरूंनी यावेळी व्यक्त केला.

### ४० वर्षांच्या इतिहासातील सुवर्णक्षण

विद्यापीठाच्या ४० वर्षांच्या इतिहासामध्ये मध्य विभाग युवा महोत्सव स्पर्धेत अशी दर्जेदार कामगिरी करून सर्वसाधारण विजेतेपद मिळवणे ही अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले. स्पर्धेपूर्वी डॉ. निखिलेश नलोडे यांनी विद्यापीठ प्रमुख विजेता ठरेल, असे भाष्य केले होते आणि विद्यार्थ्यांच्या टीमवर्क व मेहनतीच्या जोरावर हे भविष्य खरे ठरले. कुलगुरूंनी विद्यार्थ्यांच्या 'डेडिकेशन, प्लॅनिंग आणि डिसिप्लिन'चे कौतुक केले. ते म्हणाले, हा अत्यंत भावनिक आणि आनंदाचा क्षण आहे. मातीच्या कणांचे मोती झाले, एक-एक मोती एकत्र आले आणि आज मोत्याची माळ गळयात पडली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून 'मी' पासून 'आम्ही' पर्यंतचा सांगितलेला प्रवास विद्यापीठाच्या सांघिक भावनेचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले.

### विजेत्यांची दिमाखात मिरवणूक

– विजेत्या चमूचे आगमन होताच विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून संविधान शिल्पापर्यंत ट्रॉफीसह त्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी सर्व कलावंत व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले. या सत्कार समारंभास व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. राजीव बोरकर आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. राजीव बोरकर यांनी तर सूत्रसंचालन व आभार चमू व्यवस्थापक डॉ. शितल तायडे यांनी मानले. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही.एम. मेटकर, डॉ. कु. मनिषा कोडापे, डॉ. व्ही.एच. नागरे, डॉ. एच.आर. देशमुख, डॉ. अरुण हरणे, श्री एम.एम. अंधारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, आजीवन अध्ययन विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्राचार्य डॉ. विजय भांगडिया तसेच प्रशिक्षक, व्यवस्थापक, सर्व विजेते कलावंत विद्यार्थी, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्य संपदा आहार विशेष

# थंडीत घ्यावयाची काळजी

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी झोप आणि विश्रांती महत्त्वाची आहे. कोमट पाणी पिणे फायदेशीर आहे, घसा खवखवत असल्यास कोमट पाण्याने गुळण्या, दिवसातून २-३ वेळा साधी वाफ घ्यावी. आइस्क्रीम, थंड पाणी, कोल्ड ड्रिंक्स टाळा. बाहेर जाताना विशेषत: धूळ, प्रदूषण किंवा गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करा. हात वारंवार स्वच्छ धुणे, घरात व्हेंटिलेशन ठेवा.



हळदीचे दूध, मध-आलं-लिंबाचा काढा, व्हिटॅमिन सी युक्त फळे (लिंबू, संत्रे, मोसंबी) भरपूर पाणी याचा अवलंब करा. स्वतःहून अँटिबायोटिक्स घेऊ नका, तीन दिवसांपेक्षा जास्त काळ ताप, श्वास घेण्यास त्रास, सतत खोकला राहिल्यास, लहान मुलांमध्ये श्वास फुलणे, छातीत घरघर, वृद्ध व्यक्तींमध्ये दमा, हृदयाच्या तक्रारी वाढल्यास डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधोपचार घ्यावेत.

### शहरातील धुळ प्रदूषणाची गंभीर स्थिती ; यंत्रणांचे दुर्लक्ष :

शहरात अनेक ठिकाणी इमारत बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू असून त्यातून उडणारी धुळ नागरिकांच्या आरोग्यासाठी गंभीर धोका बनली आहे. बांधकामस्थळी धुळ दाबण्यासाठी पाणी मारणे, धुळ प्रतिबंधक जाळ्यांचा वापर करणे गरजेचे असताना अनेक ठिकाणी नियमांचे उल्लंघन होत आहे. याबरोबरच बांधकामातील डेब्रिज, वाळू क्रश सँड वाहतुकीदरम्यान पाणी मारणेख ताडपत्रीचा वापर करणे,

# कमी कालावधीत, कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या शेवग्याच्या पाच जाती

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.४ विदर्भ प्रजासत्ताक**

शेवग्याचे झाड आणि शेंगा महाराष्ट्रात बहुतेक सर्वांच्या परिचयाचे आहे. शेवगा हे पीक बहुपयोगी आहे, कारण या झाडाची पाने, फुले, शेंगा भाजीसाठी वापरली जातात. कमी काळात, कमी पाण्यात अधिक उत्पादन क्षमतेमुळे या बहुवार्षिक भाजीपाला पिकांच्या लागवडीचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

**शेवग्याच्या सुधारित जाती-जाफना :** हा शेवगा वाण स्थानिक आहे. याला देशी शेवगा म्हणून ओळखतात. या वाणाच्या शेंगा चवदार असतात. या वाणाचे वैशिष्ट्य एका देठावर एकच शेंग येते. ती २० ते ३० सें.मी. लांब असते. या वाणाला वर्षांतून एक वेळ म्हणजे फेब्रुवारीत फुले लागतात. मार्च, एप्रिल, मे मध्ये शेंगा मिळतात. एक किलोत २० ते २२ शेंगा बसतात. दर झाड एका हंगामात १५० ते २०० शेंगा लागतात.

**रोहित – १ :** या जातीचे वैशिष्ट्य म्हणजे लागवडीपासून सहा महिन्यात उत्पन्न सुरू होते. शेंगांची लांबी मध्यम प्रतीची ४५ ते ५५ सें.मी. असून, शेंगा सरळ, गोल असतात. रंग गर्द हिरवा असून, चव गोड असते. उपलब्ध सर्व जातींपेक्षा ३० टक्के उत्पन्न जास्त येते. व्यापारी उत्पन्न देण्याचा कालावधी ७ ते ८ वर्षांचा आहे. वर्षभरात एका झाडापासून सरासरी १५ ते २० किलो शेंगांचे उत्पन्न मिळते. शिवाय या जातीतून ८० टक्के शेंगा निर्यातक्षम गुणवत्तेच्या मिळतात.

**भाग्या (के.डी.एम. ०१) :** कर्नाटक राज्यातील बागलकोट कृषी विद्यापीठाद्वारे ही जात प्रसारित केली असून ही जात बारमाही उत्पादन देणारी आहे. ४ ते ५ महिन्यात फलधारणा होत असून शेंगाची चव उत्तम आहे. प्रति झाड २०० ते २५० शेंगा प्रति वर्ष मिळतात.

**कोकण रुचिरा :** हा वाण डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषीविद्यापीठाने विकसित केला असून याची कोकणासाठी शिफारस केली आहे. झाडाची उंची ५ ते ६ मीटर असून याच्या एका झाडाला १५ ते १७ फांद्या,




उपफांद्या येतात. शेंगा गर्द हिरव्या रंगाच्या असतात. या वाणाचे उत्पादन ओलीताखाली सर्वोत्तम येते. शेंगा एका देठावर एकच लागते. या वाणाला एकाच हंगामात शेंगा येतात. आकार मध्यम असल्यामुळे वजन कमी भरते. शेंगाची लांबी १.५ ते २ फुट असुन शेंगा त्रिकोणी आकाराच्या असतात. पूर्ण वाढलेल्या झाडापासून सरासरी ३५ ते ४० शेंगा मिळतात.

**ओडिसी :** हा वाण देखील तामिळनाडू कृषी विद्यापीठाने विकसित केला आहे. हा वाण महाराष्ट्रातील स्वतंत्र शेवगा शेतीत तसेच आंतरपीक शेवगा शेतीत घेतला जातो. **पी. के. एम. १ :** हा वाण तमिळनाडू कृषी विद्यापिठाचे पेरीया कुलम फळबाग संशोधन केंद्राने विकसित केला आहे. हा वाण चवदार असतो. शेंगा लवकर येतात. शेंगा दोन ते अडीच फुट लांब, पोपटी रंगाच्या, भरपूर व चविष्ट गराच्या असल्याने देशांतर्गत निर्यातीसाठी चांगली मागणी आहे. या वाणात रोप लावणीनंतर ६ महिन्यात शेंगा सुरू होतात. या वाणाला महाराष्ट्रातील वातावरणात वर्षांतून २ वेळा शेंगा येतात.

**कृषी विज्ञान केंद्र, साकोली, भंडारा.**

# रब्बी हंगाम पिक स्पर्धेतील सहभागासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–**

जिल्ह्यात पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात. या प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन विजेत्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात येते, रब्बी हंगाम पिक स्पर्धा २०२५ मध्ये शेतकऱ्यांना सहभागीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करावा लागणार आहे.

पिक स्पर्धेमध्ये रब्बी पिके ज्वारी, गहू, हरभरा, करडई आणि जवस या पाच पिकांचा समावेश आहे. पिकासाठी ४० आर क्षेत्रावर सलग लागवड असणे आवश्यक आहे. राज्यस्तरावर पिकस्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे




विजेते निवडण्यात येणार आहे. तालुका पातळीसाठी पहिले बक्षिस रु. ५ हजार, दुसरे बक्षिस ३ हजार व तिसरे बक्षिस २ हजार रूपये आहे. जिल्हा पातळी साठी पहिले बक्षिस १० हजार, दुसरे बक्षिस ७ हजार व तिसरे बक्षिस ५ हजार रूपये स्वरुप आहे. राज्य पातळीसाठी पहिले बक्षिस ५० हजार, दुसरे बक्षिस ४० हजार व तिसरे बक्षिस ३० हजार रूपये आहे.स्पर्धेसाठी सर्वसाधारण आणि आदिवासी गट राहणार आहे. प्रवेश शुल्क हे पिकनिहाय ३०० रुपये आणि आदिवासी गटासाठी १५० रूपये राहणार आहे. इच्छुकांनी अधिक माहितीसाठी krush. maharashtra.gov.in किंवा नजिकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# सराईत चोरटा अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** एका सराईत चोरट्याला गुन्हे शाखेच्यापथकाने अटक करून खोलापुरी गेट ठाण्याच्या हद्दीतील चोरीचा एक गुन्हा उघड आणला. यातील मुद्देमाल पोलिसानी जप्त केला. अनिकेत भगत (रा. जलारामनगर) असे अटकेतील चोरट्याचे नाव आहे. गुन्हे शाखेचे पथक शहरात आरोपींची तपासणी करीत असताना अनिकेत भगत याने मार्च महिन्यात खोलापुरी गेट ठाण्याच्या हद्दीत एक चोरी केल्याची माहिती मिळाली. त्या आधारावर पोलिसांनी अनिकेतला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली. त्याने मार्च महिन्यात कॅटर्सचा व्यवसाय करणारे राजेश मिश्रा यांच्या घरी दोन साथिदारांच्या मदतीने चोरी केल्याचे सांगितले. तसेच चोरीचा मुद्देमाल यवतमाळ येथे विकला. त्यामुळे पोलिसांनी चोरीचा मुद्देमाल जप्त करून अनिकेत भगतला अटक केली. तसेच त्याचे साथिदार विकास बागडे व हर्षल याचा शोध पोलीस घेत आहेत. याकारवाईत पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक मनिष वाकोडे, सतीश देशमुख, फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड,यांचा समावेश होता.

# दर्यापूर येथील ईव्हीएम मशीनच्या पहाऱ्यासाठी पोलीस अंमलदार व एसआरपी यांचा तगडा बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४दर्यापूर–** दोन डिसेंबर रोजी दर्यापूर नगर परिषदेची निवडणूक मोठ्या धुमधडाक्यात पार पडली असून निकाल येत्या २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे त्या अनुषंगाने ईव्हीएम मशीन पालिकेत सुरक्षित ठिकाणी व सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीत ठेवण्यात आल्या असून एस आर पी व दर्यापूर येथील पोलीसांचा खडा पहारा २४ तास लागलेला आहे दर्यापूर अमरावती येथील पोलिसांचा पहारा पालिकेत लावण्यात आला आहे कुठलाही गैरप्रकार होऊ नये म्हणून प्रशासनाच्या वतीने ठोस उपाय योजना राबविण्यात आली आहे स्ट्रॉंग रूमच्या आत आणि बाहेरील परिसरात



सीसीटीव्हीची निगराणी असणार आहे तर पालिकेमध्ये कुठल्याही अज्ञात व्यक्तींना प्रवेश पूर्णपणे नाकारला आहे आज पालिकेमध्ये दर्यापूर पोलीस स्टेशनचे एक पोलीस अधिकारी आणि पाच अमलदार तसेच एस आर पी एक अधिकारी आणि आठ अमलदार असा तगडा पोलिसांचा फौज फाटा ईव्हीएम मशीनच्या सुरक्षा दृष्टिकोनातून तैनात करण्यात आलेला आहे २१ तारखेला निकाल असून त्यामध्ये काही अडचणी निर्माण होऊ शकतात अशा अफवांना आता पूर्णपणे विराम लागला गेला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ४ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

## जिल्ह्यातील २३ गावाचा 'स्मार्ट व इंटेलिजेंट व्हिलेज' प्रकल्पात समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी 'स्मार्ट व इंटेलिजेंट व्हिलेज' प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यात जिल्ह्यातील २३ गावांचा समावेश करण्यात आला आहे.यात चांदुर बाजार तालुक्यातील बोराळा, आसेगाव, बेलोरा, टाकरखेडा पूर्णा, चिंचोली काळे, तळणी पूर्णा, वडूरा, धानोरा, खरवाडी, सर्फाबाद, खराळा, फुबगाव, जवळा शहापूर, राजुरा, जैनपूर, बेसखेडा, तळवेल, शिरजगाव बंड, रसुल्लापुर, हैदतपूर, कृष्णापूर, विरूळ पूर्णा आणि अमरावती तालुक्यातील शिराळा गावाचा समावेश आहे. या प्रकल्पात अंतर्गत ग्रामपंचायमींमध्ये स्मार्ट सेवा यात सीसीटीव्ही सर्व्हेलन्स, वाय-फाय, हॉटस्पॉट, डिजिटल शिक्षण, आरोग्य सेवा, पशुसंवर्धन, महिला व बाल कल्याण आदी विभागाच्या ऑनलाईन सेवा आणि ई-प्रकल्प, स्मार्ट कृषि सेन्सर्स, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा टप्प्याटप्प्याने



राबविण्यात येणार आहेत. या प्रकल्पासाठी राज्यात महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ हे भारतनेट फेज २ नेटवर्कच्या देखमालीसह आवश्यक तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देणार आहे.यासाठी ग्रामस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे. प्रत्येक निवडक गावात प्रकल्पाच्या अंमलबजावणी आणि प्रकल्पाच्या व्यवस्थापना साठी ग्रामपंचायत स्तरावर 'स्मार्ट व इंटेलिजेंट व्हिलेज' समिती स्थापन करण्यात येणार आहे. समिती प्रकल्पाच्या अंमलबजावणी साठी नागरिकांचा सहभाग उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देऊन सर्व सुविधा ग्रामस्थांकडून वापरण्यात येतील. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समिती प्रकल्पाचे पर्यवेक्षण करेल.

### नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू

## डॉ मनाली क्षीरसागर यांनी घेतले राष्ट्रसंताच्या समाधीचे दर्शन

### पदभार स्वीकारताच नागपुरवरून पोहचल्या थेट गुरुकुंजात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४गुरुकुंज मोझरी-**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूरच्या कुलगुरूपदी नियुक्ती झालेल्या डॉ मनाली क्षिरसागर यांनी आज(ता.३)रोजी पदभार स्वीकारल्यानंतर खुर्चीवर बसण्यापूर्वी थेट नागपूर येथून श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम (मोझरी) येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या महासमाधीचे दर्शन घेतले व आश्रमिय परिसराची संपूर्ण माहिती जाणून घेतली.अखिल विश्वाला मानवतेचा संदेश देणाऱ्या ज्या राष्ट्रसंतांच्या नावे विद्यापीठ आहे,त्या महामानवाच्या महासमाधीला नतमस्तक होऊन विद्यापीठाच्या खुर्चीवर बसण्याची ईच्छा ठेवून आज मी नागपूर येथून थेट गुरुकुंज आश्रम येथे आली असल्याचे मनोगत याप्रसंगी



कुलगुरू डॉ.क्षिरसागर यांनी व्यक्त केले व येथील परिसर पाहून मी अक्षरशः भारावून गेले. येथून एक नवी ऊर्जा व राष्ट्रसंतांचे आशीर्वाद घेऊन मी विद्यापीठातून एक सुसंस्कारित पिढी घडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले. यावेळी त्यांच्यासह विद्यापीठाचे कुलसचिव डॉ राजीव हिवसे,ग्रंथपाल डॉ विजय खंडार,नितीन खरबडे तसेच अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळाचे सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ,सरचिटणीस जनार्दनपंत बोथे,उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील,प्रचार प्रमुख गोपाल कडू, गुलाब खबसे,डॉ पाळेकर,मुख्याध्यापक मनोज कडू ,डॉ जनसेवक जयस्वाल, अध्यात्म विभागाचे प्रमुख डॉ राजाराम बोथे,अमोल बांबल आदी उपस्थित होते.यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महारांजाच्या संपूर्ण कार्याची तसेच आश्रमिय परिसराची माहिती प्रा.अरविंद राठोड यांनी कुलगुरू यांना सांगितली.आश्रमिय परिसर बघितल्यावर कुलगुरू डॉ मनाली क्षीरसागर यांचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ग्रंथसंपदा,ग्रामगीता,शाल,श्रीफळ भेट देऊन अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने स्वागत करण्यात आले.

## अमरावती रेल्वे पूल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त, नाराजीचा उडणार भडका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

शहरातील तीन प्रमुख रस्त्यांना जोडणारा जुना पक्क्या रेल्वेवरील पूल अचानक बंद करण्याच्या निर्णयाने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. जवळपास ५० वर्षांपूर्वी बांधलेला हा पूल आजही भक्कम स्थितीत असून, वाढती वाहतूक सहज पेलण्याची क्षमता त्यात असल्याचा दावा करित माजी नगरसेवक प्रदिप बाजड त्यांनी त्यावरून हलकी वाहतूक सुरू करण्याची नागणी केली आहे.

पूलाचा एकही नाग न ढासळलेला सताना केवळ एका खाजगी तांत्रिक महवालाच्या आधारे वाहतूक बंद करण्यात आली. विशेष म्हणजे, र्यायी मार्ग उपलब्ध न करतामध्यवर्ती भागातील हा महत्त्वाचा मार्ग बंद केल्याने शहराची वाहतूक विस्कळीत झाली आहे. दरम्यान, परतवाडा-धारणी मार्गावरील १५० वर्षे जुने व वास्तविक



धोकादायक ठरत असलेले पूल, तसेच अमरावतीवलगाव रोडवरील केवळ १४ वर्षांपूर्वी बांधलेला पण निकृष्ट दर्जामुळे अरुंद व अपघातप्रवण झालेला नरखेड रेल्वे पूल - या सर्वांची स्ट्रक्चरल ऑडिट न घेता त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचीही टीका त्यांनी केली.धोकादायक पुलांकडे दुर्लक्ष करून चांगल्या स्थितीतील पूल बंद करण्यामागे संशय निर्माण होत असून, या निर्णयामुळे वाहनधारकांची प्रचंड गैरसोय होत आहे. शहरातील जुन्या पुलांचे अहवाल किती मागवले, किती मिळाले व किती पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आले, याची माहिती जाहीर करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत किंवा नवीन पुलाला मंजुरी व वर्क ऑर्डर मिळेपर्यंत सदर पुलावरील आडवी भिंत काढून हलक्या वाहनांची वाहतूक तातडीने सुरू करावी, अशी मागणी प्रदीप बाजड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## अमरावतीत १ लाखांहून अधिक शेतकरी 'फार्मर आयडी'विना

### अँग्रीस्टॅक मोहिमेत जिल्ह्याची गती मंद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-**

केंद्र सरकारच्या अँग्रीस्टॅक प्रकल्पांतर्गत देशभरातील शेतकऱ्यांना 'फार्मर आयडी' देण्याची मोहीम वेगाने सुरू असली तरी अमरावती जिल्ह्यात अजूनही मोठ्या प्रमाणावर शेतकरी आयडीविना असल्याचे समोर आले आहे. सरकारी योजनांचा लाभ, अनुदान, पीकविमा दावा, नैसर्गिक आपत्तीतील नुकसानभरपाई, पीएम-किसान योजनेची रक्कम यांसह बहुतांश शासकीय मदतीसाठी आता फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आला आहे. अशा स्थितीत जिल्ह्यातील तब्बल १ लाख ६ हजार ७४७ शेतकऱ्यांकडे अद्याप फार्मर आयडी नसणे ही चिंताजनक बाब ठरत आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये एकूण ५ लाख १६ हजार १९५ शेतकरी नोंद आहेत. त्यापैकी ४ लाख ९ हजार ४४८ शेतकऱ्यांनी अँग्रीस्टॅक पोर्टलवर फार्मर आयडीसाठी नोंदणी पूर्ण केली आहे. ही संख्या एकूण नोंदणीच्या ७९.३२ टक्क्यांवर पोहोचते. मात्र उर्वरित जवळपास २० टक्के शेतकरी अजूनही नोंदणीपासून दूर आहेत. हीच मंडळी नुकसानभरपाईसाठी केवायसी प्रक्रियेमुळे मोठ्या अडचणीत सापडत असून, वेळेवर मदत न मिळण्याची शक्यता अधिक असल्याचे महसूल विभागाच्या सूत्रांकडून सांगितले जाते. अँग्रीस्टॅक उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे देशातील प्रत्येक शेतकऱ्याचा एकत्रित डिजिटल डेटा तयार करणे, त्यांना थेट शासकीय लाभ देणे आणि अनुदानाचा प्रवास पारदर्शक करणे. आधार लिंकिंग, सातबारा पडताळणी, बँक केवायसी, भूधारकाची डिजिटल नोंदणी अशा प्रक्रियेद्वारे शेतकऱ्यांचा एकच 'युनिक आयडी' तयार केला जातो. मात्र ही प्रक्रिया अनेकांसाठी गुंतागुंतीची ठरत आहे. काही शेतकऱ्यांकडे आवश्यक कागदपत्रे नसणे, इंटरनेट सुविधेचा अभाव, आधार- मोबाईल लिंकिंगमध्ये अडचणी, सातबाराच्या प्रतींची पडताळणी न होणे अशा कारणांमुळे नोंदणीचा वेग मंदावल्याचे अधिकाऱ्यांचे मत आहे. तालुका-निहाय नोंदणीत चिखलदरा आणि धारणी आघाडीवर असल्याचे आकडेवारीत दिसते.



चिखलदऱ्यात तब्बल १०४ टक्के नोंदणी होऊन ओव्हर अचिव्हमेंट साध्य झाली आहे. धारणी येथेही ९९.१५ टक्के नोंदणी पूर्ण झाली आहे. या दोन्ही मेलघाटातील तालुक्यांनी राज्यातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याखालोखाल अंजनगाव सुर्जी - ८२ टक्के, चांदूर रेल्वे - ८१ टक्के आणि धामणगाव रेल्वे - ८० टक्के नोंदणी झालेली आहे. मात्र इतर काही तालुक्यांमध्ये प्रगती समाधानकारक नसल्याचे दिसते. अनेक शेतकरी फार्मर आयडीच्या गरजेबद्दल अनभिज्ञ असल्याने किंवा कागदपत्रे अपूर्ण असल्याने प्रक्रिया सुरू करू शकलेले नाहीत. यामुळे आगामी खरीप आणि रब्बी हंगामात संभाव्य नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पीकहानी अशा प्रसंगांमध्ये मदत मिळण्यात या शेतकऱ्यांना विलंब होऊ शकतो. पीकविमा योजनेसाठी दावा दाखल करतानाही फार्मर आयडी आवश्यक असल्याने अनेक शेतकरी योजनांपासून वंचित राहण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्याउलट आधीच नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात नैसर्गिक आपत्तीची मदत व अनुदान थेट जमा होत असल्याने त्यांना कोणताही अडथळा येत नाही.महसूल विभाग व कृषी खात्याच्या पथकांकडून शेतकऱ्यांना नोंदणीसाठी जागरूक करण्याचे प्रयत्न सुरू असून ग्रामपातळीवर विशेष मोहिमा राबविण्याचे नियोजन करण्यात आल्याचे कळते. शेतकऱ्यांनी फार्मर आयडी नसल्यास लवकरात लवकर नोंदणी करून आवश्यक केवायसी कागदपत्रे पूर्ण करावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. कारण हा आयडी आगामी काळात सर्व शासकीय लाभांची मुख्य कडी ठरणार असून त्याविना कोणतीही आर्थिक मदत मिळण्यावर प्रश्नचिन्ह कायम राहणार आहे.-

## वरुड चा नगराध्यक्ष कोण ?उमेदवारांमध्ये धाकधूक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४वरुड-** स्थानिक नगर परिषदेच्या नगराध्यक्षासह नगरसेवकपदाच्या २६ जागांकरिता दि. २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले. या निवडणुकीसाठी रिंगणात असलेल्या नगराध्यक्षपदासाठी नऊ आणि नगरसेवक पदाकरिता ११५ उमेदवारांचे भवितव्य मशीनमध्ये बंद झाले. दरम्यान नगराध्यक्ष पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याबाबत विविध चर्चा शहरात रंगल्या आहेत. मात्र, निकालाचा कौल काय असेल, यामुळे उमेदवारांमध्ये धाकधुक वाढली आहे.



मंगळवारी वरुड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व नगरसेवकपदासाठी निवडणूक पार पडली. यात नगराध्यक्षाकरिता जनतेतून आणि नगरसेवकांसाठी प्रभागनिहाय मतदान घेण्यात आले. मतदानकेंद्र दूर असल्यामुळे मतदारांच्या दिमतीला उमेदवारांकडून विविध वाहनने दिमतीला होती. शहरातील सात अतिसंवेदनशील केंद्रांवरसुद्धा शांततेत मतदान पार पडले. असून उमेदवारांसह मतदारांचे निकालाकडे लक्ष लागले आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट), भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजीत पवार गट), कॉंग्रेस, शिवसेना (उबाठा), शिवसेना (शिंदे गट), प्रहार तसेच अपक्षांचे सर्वस्व पणाला लागले असले, तरी मात्र काही प्रभागांमध्ये रिंगणात असलेल्या अपक्ष उमेदवारांमुळे अनेकांची समीकरणे बिघडण्याची चिन्हे आहेत. प्रभागनिहाय मतमोजणी होणार असून चार फेऱ्यांमध्ये ही मतमोजणी होणार आहे. यासाठी ४५ कर्मचारी नियुक्त केले असून सांस्कृतिक भवन येथे स्ट्राँग रूम तयार करण्यात आली आहे. येथे मतपेट्यांच्या सुरक्षेसाठी नऊ पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले. स्ट्राँग रूमवर वेळोवेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसह वरिष्ठ पोलिस अधिकारी भेटी देत राहणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रदीप पवार, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी गजानन भोयर यांनी दिली.


## मनपाची प्रारुप मतदार यादी

### शेवटच्या दिवस अखेर ८७१ आक्षेप दाखल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती,**

महापालिका निवडणुकीसाठी गुरुवार २० नोव्हेंबरला मनपाची प्रारुप मतदार यादी जाहिर करण्यात आली होती. त्यानंतर २१ ते २७नोव्हेंबरदरम्यान प्रथम आक्षेप व हरकतीची मुदत दिली होती. यानुसार गुरुवार २७ नोव्हेंबर २०१५ आक्षेप नोंदविण्याचा शेवटचा दिवस होता. मात्र निवडणूक आयोगाकडून ३ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिल्याने आक्षेपांच्या संख्येत वाढ झाली आहे. बुधवारला शेवटच्या दिवस अखेर एकूण ८७१ आक्षेप दाखल करण्यात आले होते.

२० नोव्हेंबरला यादी जाहिर झाल्यानंतर पहिल्या दिवशी शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी २५ जणांनी आक्षेप दाखल केले होते. तर मंगळवार २४ नोव्हेंबरपर्यंत १०० जणांनी हरकती घेतल्या होत्या. आता सहाव्यादिवशी २६ नोव्हेंबरपर्यंत हरकतींची संख्या ही ४०५ एवढी झाली होती. त्यानंतर २७ नोव्हेंबर रोजी ३ डिसेंबरपर्यंत मुदत वाढ देण्यात आली होती. त्यामुळे बुधवारला शेवटच्या दिवस अखेर ८७१ आक्षेपदाखल करण्यात आले आहे. यामध्ये माजी महापौर, माजी सभापती, काही माजी नगरसेवक तसेच विविध पक्षाचेपदाधिकारी, इच्छुक उमेदवार व संघटनांचे पदाधिकाऱ्यांचा सुद्धा समावेश आहे. यामध्ये एका प्रभागातून नाव काढून दुसऱ्या प्रभागात समाविष्ठ करणे, मतदारीत यादीत नावाचे स्पेलिंग दुरुस्त करणे



यासह अनेक आक्षेप प्राप्त झाले आहेत.आता प्रारूप मतदार यादीवर दाखल आक्षेप जागीच निरीक्षण करून व्हेरिफाय करण्यात येईल. त्यानंतर १० डिसेंबर २०१५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. मतदान केंद्राच्या ठिकाणची यादी १५ डिसेंबरला व मतदान केंद्र निहाय मतदारयादी २२ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. १ जून २०२५ यादीनुसार २२ प्रभागातील ६ लाख ८१ हजार ५१९ मतदार मतदाराचाया यादित समावेश आहे.

## अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी प्रसिध्द

### आक्षेप व हरकती ३ ते १८ डिसेंबरपर्यंत नोंदविता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती-** महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षकमतदारसंघांसाठी १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित नवीन मतदार यादी तयार करण्याचे सुधारित वेळापत्रक भारत निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे. त्यानुसार अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी बुधवार, ३ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली आहे.

मतदार यादीची प्रत विभागीय, जिल्हा, उपविभागीय व तहसील स्तरावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे, असे अपर आयुक्त संजय जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारेकळविले आहे.

मतदार नोंदणी अधिनियम, १९६० नुसार या पुनरिक्षण कार्यक्रमाचे टप्पे आखण्यात आले आहे.

त्यानुसार हस्तलिखिते तयार करणे आणि प्रारुप मतदार याद्यांची छपाईदि. २८ नोव्हेंबर, २०२५ रोजी करण्यात आली आहे. तसेच आज दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रारुप मतदार याद्यांची प्रसिध्दी करण्यात आली आहे.



मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे कलम १२ अंतर्गत, मतदार याद्यांवर ३ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. तसेच दावे व हरकती ५ जानेवारी २०२६ रोजी निकाली काढण्यात येतील. याच दिवशी पुरवणी यादी तयार करणे व छपाई करण्यात येणार आहे. उक्त दावे व हरकतीचा कालावधी संपल्यानंतर दि. १२ जानेवारी २०२६ रोजी अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिध्दी करण्यात येईल.

मतदार नोंदणी अधिनियम १९६० मधील नमूना ५ नुसार प्रारुप मतदार यादी प्रसिध्दीची सूचना प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. तसेच मतदार नोंदणीमध्ये अद्याप पात्र शिक्षक नाव नोंदणी करण्याचे कोणी राहीले असल्यास किवा इच्छुक असल्यास अमरावती विभाग शिक्षक मतदार संघामध्ये नोंदणी करु शकतात, असे कळविण्यात आले आहे.-

## ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती,**

जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला आहे.

सदर आदेश दि. १४ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी कळविले आहे.

# दिव्यांग आनंद महोत्सवातून समतेचा संदेश; समाजाने समान संधी देणे हीच खरी जबाबदारी – आयुक्त सौम्या शर्मा चांडक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती–** अमरावती महानगरपालिका समाज विकास विभाग आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने समता सप्ताह (समान संधी दिवस) निमित्त ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर २०२५ या कालावधीत दिव्यांग आनंद महोत्सव हा विशेष उपक्रम उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव जपणाऱ्या वातावरणात पार पडला. हा महोत्सव शहरातील महानगरपालिका उच्च प्राथमिक मराठी शाळा क्र. १३, चपराशीपुरा येथे भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला. *कार्यक्रमाचे भव्य उद्घाटन*कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या औपचारिक स्वागताने करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, समाज विकास अधिकारी धनंजय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.सर्व मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून दिव्यांग आनंद महोत्सवचे उद्घाटन करण्यात आले. दिव्यांग बांधवांसाठी हा कार्यक्रम समर्पित असल्याचे प्रतिपादन यावेळी करण्यात आले.

**दिव्यांग विद्यार्थ्यांचा सन्मान – प्रेरणादायी क्षण**

कार्यक्रमातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांचा सत्कार. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तसेच संघर्षातून यश मिळवलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यांच्या यशकथा आणि संघर्षवृत्तांमुळे उपस्थितांमध्ये प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.मान्यवरांनी आपल्या मनोगतात दिव्यांग विद्यार्थी समाजाचा अविभाज्य भाग असून त्यांना समान संधी,



शिक्षण, रोजगार व सामाजिक सहभाग यासाठी वातावरण निर्माण करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. महापालिकेच्या विविध योजनांची माहितीही यावेळी देण्यात आली. *जनजागृती रॅली – समतेचा संदेश जनतेपर्यंत*समता सप्ताहाच्या अनुषंगाने एक भव्य आणि प्रभावी जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये विद्यार्थी, शिक्षक, स्वयंसेवी संस्था, महापालिका कर्मचारी, नागरिक यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. रॅलीत समान संधी हा प्रत्येकाचा हक्क, दिव्यांग सक्षमीकरण – समाजाची जबाबदारी अशा संदेशांनी भरलेले फलक आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शहरातील नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरला.

**कार्यक्रमातील विविध उपक्रम–** महोत्सवाच्या दरम्यान दिव्यांग मुलांसाठी आणि सहभागींसाठी विविध सांस्कृतिक, क्रीडा आणि आनंददायक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नृत्य, गीत, नाटिका, चित्रकला तसेच विशेष खेळांच्या स्पर्धांमध्ये मुलांनी उत्साहाने भाग घेतला. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि आत्मविश्वासामुळे संपूर्ण वातावरण उत्साहपूर्ण झाले.

**महानगरपालिकेचा सामाजिक उपक्रम** – सर्वत्र कौतुक अमरावती महानगरपालिकेने दिव्यांग कल्याण आणि समान संधी याबाबत घेतलेल्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत असून, समाजात सकारात्मक बदल घडवण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांची नितांत गरज असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

समावेशक समाजाच्या निर्मितीकडे वाटचाल*दिव्यांग आनंद महोत्सव हा केवळ कार्यक्रम न राहता समावेशक समाजाच्या निर्मितीचा संदेश देणारा उपक्रम म्हणून यंदाच्या समता सप्ताहात विशेष ठसा उमटवून गेला. समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी व सहभाग मिळावा हा उद्देश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला. अमरावती महानगरपालिकेचा हा उपक्रम येत्या काळात आणखी व्यापक प्रमाणात राबविण्यात यावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मनोगत करतांना सांगीतले की, समता सप्ताहाच्या निमित्ताने आज येथे 'दिव्यांग आनंद महोत्सवा'च्या माध्यमातून आपणा सर्वांसमोर उपस्थित राहण्याचा अत्यंत आनंद आणि अभिमान वाटतो. अमरावती महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षी समता, समान संधी आणि सर्वसमावेशकतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतो. दिव्यांग बांधव हे आपल्या समाजाचा अविभाज्य आणि महत्त्वपूर्ण घटक आहेत. त्यांच्यामध्ये असलेल्या प्रतिभेला योग्य संधी आणि योग्य व्यासपीठ मिळाले, तर ते कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करू शकतात, हे आम्ही अनेक उदाहरणांमधून अनुभवले आहे. आज येथे सन्मानित झालेल्या सर्व दिव्यांग बांधवांचे मन:पूर्वक अभिनंदन करते. त्यांचा आत्मविश्वास आणि संघर्षाची कथा ही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. अमरावती महानगरपालिका दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अधिक चांगल्या सुविधा, शैक्षणिक संधी, कौशल्यविकास उपक्रम आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी सातत्याने काम करत आहे आणि पुढेही करत राहील. समाजानेदेखील मानसिकता बदलून दिव्यांग विद्यार्थ्यांना सहानुभूती नव्हे तर समान संधी आणि सन्मान देण्याची गरज आहे.आजच्या या महोत्सवाने पुन्हा एकदा सिद्ध केले की, क्षमता ही शरीरात नसते, ती मनात आणि इच्छाशक्तीत असते.आपण सर्वांनी मिळून एक समता, सन्मान आणि समावेशकतेवर आधारित समाज उभा करणे हीच खऱ्या अर्थाने आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.या कार्यक्रमात श्री मिलिंद कुबडे प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण अमरावती, श्री पंकजकुमार सपकाळ सहाय्यक कार्यक्रम अधिकारी,श्रीमती लीना अकोलकर अधीक्षक शिक्षण विभाग, वाहिद खान, मो. जावेद शाळा निरीक्षक, कु. चित्र खोब्रागडे मुख्याध्यापक मनपा शाळा क्र. १३ चपराशीपुरा हे उपस्थित होते.या सोहळ्यामध्ये शैक्षणिक, कला, संगीत या श्रेत्रात प्रावीन्य प्राप्त केलेल्या १८ दिव्यांग विद्यार्थी यांचा गुणगौरव करण्यात आला.तसेच एकूण २० दिव्यांग विद्यार्थी यांनी आपले कला गुण सादर केले.कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. प्रणाली केवठे यांनी केले. हा सोहळा यशस्वीरित्या साजरा करण्या करिता श्री उज्वल जाधव समावेशित शिक्षण समन्वयक ,श्री कैलास कुलट, श्री सुमेश वानखडे, श्री विशाल वालचाले,श्री अतुल बोबडे, श्री गिरीश लाकडे, कु. सोनिया पवार, कु, भारती मालखेडे, कु.दीपाली थोरात, कु पूनम कनेर, कु. कुमुदिनी देवळे,कु. वैशाली सोळंके विशेष शिक्षक यांनी परिश्रम घेतले.

# मोदींनी घर दिलं, मायक्रोफायनान्सने लुटलं !

## भाजप नेते तुषार भारतीय यांचा आरोप: पीडित कुटुंबांना न्याय मिळेपर्यंत लढण्याची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** साईनगर प्रभागातील म्हाडाच्या नवीन ६५० गाळ्यांच्या घरकुल योजनेने गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घर मिळवण्याचा मार्ग मोकळा केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सर्वांसाठी घरे' या स्वप्नातून निर्माण झालेली योजना प्रत्यक्षात गरीब कामगारांसाठी वरदान ठरण्याऐवजी मायक्रोफायनान्स कंपन्यांच्याअत्याचाराचे साधन ठरल्याचा गंभीर आरोप भाजप नेते तुषार भारतीय यांनी केला आहे. मोदीजींनी घरे दिली, सबसिडी दिली पण मायक्रोफायनान्स कंपन्यांनीच गरीबांना लुटले, असा तीव्र आरोप भाजपा नेते तुषार भारतीय यांनी केला.म्हाडाच्या या योजनेअंतर्गत लाभार्थींना ११.५० लाख रुपयात फ्लॅट उपलब्ध




करून देण्यात आले. केंद्र सरकारची सबसिडी २.५० लाख रुपये आहे. लाभार्थ्यांनाभरायची रक्कम ८ लाख रुपये आहे. प्रत्यक्षात मात्र ८ लाखांचे कर्ज घेतलेल्या कुटुंबांकडून आता २६ लाख रुपयांपर्यंत वसुली केली जात आहे. ही तर थेट पठाणी वसुली आणि खुलेआम सावकारी आहे, असा संतप्त आरोप तुषार भारतीय यांनी केला. रक्कम दुप्पट, तिप्पट वसूली जात आहे. या योजनेअंतर्गत घरकाम करणारे, चालक, ऑटोरिक्षाचालक, सुरक्षा रक्षक, नर्स, टेलरिंग कामगार अशा कमी उत्पन्न गटातील लोकांना घरे मिळावीत म्हणून ही योजना होती. मात्र बहुसंख्य लाभार्थ्यांकडे ८ लाख रुपये भरण्याची क्षमता नसल्याने बँकांनी कर्ज द्यायला नकार दिला.

संधीचा फायदा घेत मायक्रोफायनान्स कंपन्या पुढे आल्या आणि १२ ते १४ टक्के व्याजदराने कर्ज देण्यास सुरुवात केली, असा आरोप करण्यात आला. भारतीय म्हणण्यानुसार, फसव्या योजना, दिशाभूल करणाऱ्या अटी आणि जड हप्ते यांच्या आहारी जाऊन गरीबांनी यांच्या

कर्ज घेतले; परंतु आता त्यांचेच जीवन संकटात आले आहे. हप्त्यांनी हैराण; घर चालवायचे की कर्ज फेडायचे. हातावर पोट असलेल्या कुटुंबांना दर महिन्याला कर्जाचा जड हप्ता, त्यात वीज–पाणी बिल, मुलांचे शिक्षण, घरखर्च है सांभाळणे अशक्य होऊ लागले आहे. आजारपण आले की हप्तां थकतो आणि मायक्रोफायनान्स कंपन्यांचे एजंट घरी दडपशाही, येऊन शिवीगाळ आणि मानसिक त्रास देत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत.

**पीडित कुटुंबांच्या भारतीय यांनी ऐकल्या समस्या**

पण मोदीनी गरीबांना घरे दिली. सबसिडी दिली मायक्रोफायनान्सवाल्यांनी त्यांची लूट चालवली, या कुटुंबांचं घराचं स्वप्न भंग होऊ देणार नाही. न्याय मिळाल्याशिवाय मी थांबणार नाही. अन्याय करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी जे काही करावे लागेल ते करू, प्रशासन, म्हाडा आणि पोलिस यांच्याकडून कारवाईची मागणी करू, असा निर्धार तुषार भारतीय यांनी व्यक्त केला. या बैठकीला परिसरातील नागरिकांसोबत माजी महापौर चेतन गावंडे, मोरे, निरंजन दुबे, श्रीलेश खांडेकर, मंदार नानोटी आदी मान्यवर उपस्थित होते.

# देशीकट्टा व पाच काडतूस बाळगणारा युवक अटकेत

## गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** देशी कट्टा व पाच जिवंत काडतूस जवळ बाळगणाऱ्या युवकाला गुन्हेशाखेच्या पथकाने बुधवारी सायंकाळी नेमाणी गोडाऊन लगतच्या पुलाखाली संशयीत रित्या फिरतांना अटक केली. युवराजसींग मुकिंदसींग बावरी (वय १९ रा. तळेगाव शामजी पंत, ता. आष्टी, जि. वर्धा) असे अटकेतील युवकाचे नाव आहे.

गुन्हेशाखेचे पथक बुधवारी रात्रीला बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असतांना नेमाणी गोडाऊन लगतच्या पुलाखाली एक युवक संशयीत फिरतांना दिसताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि त्याची



अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक देशी कट्टा व पाच जिवंत काडतूस दिसताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन कसून विचारपूस केली असता त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही त्यामुळे गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. तसेच देशी कट्टा व पाच जिवंत काडतूसअसा एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनी महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, संग्राम भोजने, विकास गुडधे, मिर्झा नईम बेग, योगेश पवार आणि संदीप खंडारे यांचा समावेश होता.

# शासनामार्फत खरेदी करण्यात येत असलेल्या कापूस खरेदीची प्रति एकर क्षमता वाढवण्यात यावी– खा. बळवंत वानखडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती –** दर्यापूर (तालुका प्रतिनिधी)अमरावती जिल्ह्यात सततच्या पावसाने पैसेवारी कमी आली असल्याने तसेच कंपसाचे उत्पादन कमी झाले असल्याचे कृषि विभागाने भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) यांना काळविल्याने सीसीआय मार्फत प्रति एकरी ७ क्किंटल एवढी मर्यादा निक्षित केली होती. परंतु काही भागात कंपसाचे उत्पादन चांगले झाल्याने शेतकऱ्यांना त्यांना माल खंजिगी बाजारात कवडीमोल भावावर विकावा लागत आल्याने सीसीआय मार्फत खरेदीची क्षमता प्रति एकर १२ क्किंटल करण्याची मागणी खासदार बळवंत वानखडे यांनी भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) चे व्यवस्थापकीय संचालक आणि अपर मुख्य सचिव , कृषि विभाग यांना लेखी पत्राद्वारे तसेच दूरध्वनीवरुण केली चर्चाकरूनकेली.अमरावती जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन घेतल्या जाते. कापसाचा खाजगी बाजारातीलभावशासनाच्याहमीभावापेक्षा कमी असल्याने कापूस उत्पादक शेतकरी भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) कडे विक्री करण्याचा ओढ जास्त आहे. परंतु यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने खरीप हंगामातील पिके बाधित झाले होते. परिणामी जिल्ह्यातील सुधारित पैसेवारी कमी असल्याने तसेच जिल्ह्यातील कापसाचे कमी उत्पादन झाल्याचे कृषि विभागानेभारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) ला कळवल्यानुसार सीसीआय मार्फत शेतकाऱ्यांकडून एकरी ७ क्किंटल खरेदीची क्षमता ठेवण्यात आली होती. त्यामुळे शेतकऱ्यांना एकरी ७ क्किंटलपेक्षा जास्त कापसाची विक्री सीसीआय कडे करता येत नसून त्यांना त्यांचा कापूस खाजगी बाजारात कवडीमोल भावात विक्री करावा लागत आहे. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाकडून कापूस खेरेदीची प्रति एकर ७ क्किंटल एवजी असलेली मर्यादा प्रति एकर १२ क्किंटल करण्याची मागणी होत आहे. यांची दखल घेत खासदार बळवंत वानखडे यांची भारतीय कपास निगम लिमिटेड (सीसीआय) चे व्यवस्थापकीय संचालक श्री वर्मा साहेब आणि श्री



रस्तोगी साहेब , अपर मुख्य सचिव , कृषि विभाग यांना लेखी पत्र तसेच दूरध्वनीवरुण चर्चा केली .

# अमरावतीतील कुख्यात गुन्हेगार फिरोज उर्फ 'बाली' काझीवर एमपीडीए कारवाई; आयुक्तांचे आदेश, मध्यवर्ती कारागृहात दाखल

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती**

शहरातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी पोलीस विभागाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली असून, अमरावतीतील कुख्यात व सातत्याने सक्रिय असलेल्या गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. (महाराष्ट्र प्रिव्हेंटिव्ह डिटेंशन ॲक्ट) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. यानुसार फिरोज काझी उर्फ बाली जहीरोद्दिन काझी (वय ३३, रा. इकबाल कॉलनी, अमरावती) यास स्थानबद्धतेचा आदेश जारी करून मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल करण्यात आले आहे.फिरोज काझी हा सन २०२१ पासून विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय असून त्याच्याविरुद्ध नागपुरी गेट पोलीस स्टेशनमध्ये एकूण ०८ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. यात दुखापत, गंभीर प्रक्षोभ न घडवता हमला करणे, जीवघेणी धमकी देणे, अश्लील कृती, दोन किंवा अधिक व्यक्तींनी समान उद्देशासाठी केलेल्या कृती, शांतता भंग करण्याचा प्रयत्न, फौजदारीपात्र धाकदपट, खंडणी, अंमली पदार्थजवळ बाळगणे, अवैध शस्त्रे



बाळगणे व विक्री करणे, हद्दपार आदेशाचे उल्लंघन, तसेच अधिसूचनांचे उल्लंघन अशा गुन्ह्यांचा समावेश आहे. त्याच्यावर यापूर्वी अनेक प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या असून त्यास तडीपारही करण्यात आले होते. तरीही तो गुन्हेगारीत सक्रिय राहिल्याने एमपीडीए कारवाईची गरज भासली.या कारवाईसाठी पोलीस स्टेशन नागपुरी गेट येथील वपोनि हनमंत उरलागोंडावार व पोलीस निरीक्षक जनार्दन साळुंखे यांनी सविस्तर प्रस्ताव तयार करून सपोआ राजेंद्र पाटील (गाडगेनगर विभाग), पोउपआ गणेश शिंदे (परिमंडळ–१) व पोउपआ (मुख्यालय) रमेश धुमाळ यांच्या मार्फत पाठविला. त्याची तपासणी गुन्हे शाखेच्या सपोआ शिवाजी बचाटे, व.पो.नि. श्रीमती सीमा दाताळकर, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. एमपीडीए सेलमधील सपोनि इम्रान नायकवडे, सहायक पोउपनि अजय मिश्रा, चेतन कराडे तसेच नागपुरी गेट पोलीस स्टेशनचे आनंद ठाकूर व मंगेश बोरकर यांनी प्रस्तावाची संपूर्ण पूर्तता केली.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला लुटणारे दोघे जेरबंद

## गाडगेनगर पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती**

रात्रीला घराकडे पायी जाणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला मारहाण व लुटणाऱ्या दोघांना गाडगेनगर पोलिसांनी अटक केली. अक्षय बाळू जुनघरे (वय ३०, रा. नवसारी) आणि अक्षय गजानन नेमाळे (वय २७, रा. इंदिरा गांधी झोपडपट्टी, रासेगाव) अशी अटकेतील लुटारुंची नावे आहेत.

६५, अरविंद मनोहर विंचुरकर (वय रा. तारांगणनगर) हे सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. ३० नोव्हेंबर रोजी ते नागपूर येथून कर्मचारी महासंघाचा कार्यक्रम आटोपून अमरावतीला आले आणि मध्यरात्रीच्या सुमारास शासकीय तंत्रनिकेत महाविद्यालयासमोरून पायी घरी जात होते. दरम्यान दोन युवकांनी त्यांना थांबवून पिण्यास पाणी मागितले, परंतु त्यांच्याकडे पाणी नसल्यामुळे त्यांनी नकार दिला आणि पुढे निघाले. तेव्हा युवकांनी त्यांना लाथ मारून खाली पाडले आणि त्यांच्या खिशातला मोबाईल हिसकावून पळून गेले. याघटनेत पोलिसांनी गुन्हा दाखलपरिसरातील करून दोन्ही आरोपींचा शोध सुरू केला. तसेच सिसिटिव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली. त्यावरून लुटारूंची ओळख पटली.दोन्ही लुटारू रेवसा गावात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी त्यांना मंगळवारी रात्री अटक करून त्याच्या ताब्यातून चोरीचा मोबाईल जप्त केला. याकारवाईत गाडगेनगरचे ठाणेदार ठाणेदार अतुल वर यांच्या नेतृत्वात सहायक मनोजकुमार मानकर, पोलीस अंमलदार भारत वानखडे, प्रकाश मिसाळ, नंदकिशोर करोची, आशिष ठाकरे, सुशांत प्रधान, मतिन शेख यांच समावेश होता.

# हिवाळी अधिवेशनात लोकहिताचे प्रश्न बुलंद

## रवी राणा यांच्या लक्षवेधी सूचनांना सभागृहात मिळणार थेट उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात आमदार रवी राणा यांनी मतदारसंघातील जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळावा यासाठी अधिनियम १०५ अंतर्गत महत्त्वपूर्ण लक्षवेधी सूचना ऑनलाईन सादर केल्या आहेत. या सूचनांवर मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांकडून सभागृहात थेट उत्तर मिळणार असल्याची माहिती त्यांचे सचिव उमेश ढोणे यांनी दिली. अधिवेशनाचे कामकाज ८ ते १४ डिसेंबर दरम्यान पार पडणार आहे.



रवी राणा यांनी विविध विभागांच्या माध्यमातून मतदारसंघातील प्रलंबित कामांना गती देण्यासाठी अनेक मागण्या मांडल्या आहेत. सामाजिक न्याय विभागाकडे भातकुली व अंजनगाव बारी येथे १०० क्षमतेची वसतिगृहे मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. मुख्यमंत्री विभागाकडे भातकुली दिवाणी न्यायालय इमारत बांधकामासाठी निधी आणि अमरावती गोपालनगर अंडरपासचे लोकार्पण करण्याचे प्रस्ताव पाठवण्यात आले आहेत.

आदिवासी विकास विभागाकडे कोळी महादेव (डढ) पोटजातीशी संबंधित ऐतिहासिक त्रुटी दूर करून प्रमाणपत्रे निर्गमी करावीत, तर गृह विभागाकडे अमरावतीत दोन नवीन पोलीस स्टेशन उभारण्याची मागणी आहे.

कृषी, जलसंपदा, महसूल आणि उद्योग विभागांकरिता शेतकरी संरक्षण, पेंढी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, आदिवासी भवनासाठी निधी आणि भातकुलीत लघु एमआयडीसी स्थापनेसाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच नगर विकास विभागाकडे राजकमल चौकातील फुल ब्रिज दुरुस्ती, आंबेडकर स्मारकासाठी जागा खरेदी आणि मनपासाठी नवीन इमारतीसाठी निधी प्रस्तावित आहे.

या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी आमदार रवी राणा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे सचिव ढोणे यांनी सांगितले.

# डिसेंबरच्या सुरुवातीला रब्बीची केवळ ६२ टक्के पेरणी

## अवकाळीचा फटका, गेल्या मोसमात याच कालावधीत ७५ टक्क्यांच्यावर लागवड



### तालुका सरासरी क्षेत्र पेरणी

धारणी १८८०९.०८ ७२.२३% चिखलदरा ४७०२.२८ २४.६६% अमरावती ९३०८.८२ ५९.७८% भातकुली ८९२२.४ ५०.१९% नांदगाव खं. १४९९५ ६२.९५% चांदूर रेल्वे ६९७७.३१ ८८.१८% तिवसा १२०५१.२९ ६७.६१% मोर्शी ९६४९.३१ ६७.८२% वरूड ५५८४.५२ ८२.९४% दर्यापूर १६०४३.५३ २८.५८% अं. सुर्जी ७४३१.४२ ३८.७१% अचलपूर ७९७२.८८ ४५.५८% चांदूर बाजार १३२८१.९८ ४०.८०% धामणगाव १७३०१.०२ १०९.९४% एकूण १५४०१०.८४ ६२.१३%

यावर्षी अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे जमिनीत बुरशीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पेरणी पूर्वी बियाण्यांवर प्रक्रिया करणे अत्यावश्यक आहे. शेतकऱ्यांनी बियाण्यांची निवड करताना काळजी घ्यावी. मान्यताप्राप्त कंपनीचे बुरशी नाशक बियाणे वापरावे. घरच्या बियाण्याचा वापर करणार असल्यास पेरणी पूर्वी बुरशी नाशक प्रक्रिया करूनच पेरणी करावी.

**राहुल सातपुते,**
**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अतिवृष्टीमुळे खरिपात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने रब्बीच्या पेरणीत शेतकऱ्यांनी एकूणच सावध पवित्रा घेतल्याचे जिल्ह्यातील चित्र आहे. यंदा पाऊस लांबल्याने तसेच शेतकऱ्यांना कोणतीही जोखीम नको असल्याने डिसेंबर महिना सुरू झाला तरी रब्बीची जिल्ह्यात ६२ टक्केच पेरणी झाली आहे. गेल्या मोसमात याच कालावधीत ७५ टक्क्यांच्या वर रब्बीची पेरणी झाली होती.

जिल्ह्यात एरवी १५ नोव्हेंबर पर्यंत रब्बीच्या पेरणीसाठी पोषक वातावरण असते. हलकी थंडी, काहीशा उष्ण हवामानात पिकांची उगवण क्षमता चांगली राहते. मात्र मागील महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे पेरण्यांना उशीर होत आहे. कृषी विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार, सध्या ३ डिसेंबरपर्यंत जिल्हाभरात अवघ्या ६२.१३ टक्केच रब्बीच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. गतवर्षी याच दिवसांपर्यंत ७५ टक्क्यांच्या वर सरासरी पेरण्या आटोपल्या होत्या. मात्र, यंदा त्यात घट झाली आहे.

दरम्यान जिल्ह्यात आतापर्यंत धारणी तालुक्यात सर्वाधिक ७२.३३ टक्के पेरणी झाल्याची नोंद आहे. तर चिखलदरा तालुक्यात अद्याप फक्त २४.६६ टक्के पेरणी होऊन तो माघारीला आहे. यावर्षी गव्हाच्या पेरणीला मोठी गती मिळाल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. जिल्ह्यात एकूण सरासरीच्या तुलनेत २२ हजार ११३ क्षेत्रात गव्हाची पेरणी झाली आहे. विशेषतः धामणगाव रेल्वे तालुक्यात ६ हजार ४६ हेक्टर क्षेत्रात गव्हाची पेरणी पूर्ण झाली. त्या पाठोपाठ २०३ हेक्टर क्षेत्रात मका पेरण्यात आला आहे. खरीपातील उभी पिके उशीरा काढून घेतल्याने गहू आणि हरभऱ्याची पेरणी उशीरा होत आहे. ते बघता उर्वरित.

पान ४ जिल्ह्यात १ ऑक्टोबरपासून रब्बीच्या पीक कर्ज वितरणास सुरुवात झाली आहे. १५ नोव्हेंबरपर्यंत बँकांनी ५३ कोटी ८८ लाख रुपयांचे कर्ज वितरीत केले आहे. एकूण ४५० कोटी रुपयांच्या तूलनेत हे प्रमाण केवळ १२ टक्के इतके आहे. ४८ हजार ३०० शेतकऱ्यांना रब्बीचे पीक कर्ज वितरीत करायचे असताना केवळ दीड महिन्यांत २,५१८ शेतकऱ्यांना कर्ज वाटले आहे. सात बँकांनी तर अद्याप कर्ज वाटपाला सुरुवातही देखील केली नाही.

# पाचशे मीटर लांबीचा पांदन रस्ता दुरुस्ती करता घेतला ग्रामस्थांनी पुढाकार

## आदर्श ग्राम सांगवा बुद्रुक चा उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दर्यापूर आदर्श गाव ग्रामपंचायत सांगवा बू येथे संविधान दिनानिमित्त उद्देशिकेचे वाचन करण्यात आले तसेच संविधान दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत सांगवा येथील सांगवा उपराई पांदन रस्ता लोकसहभाग व श्रमदानातून दुरुस्त करण्यात आला या मध्ये गावातील नागरिक अनिलभाऊ सगणे,आकाशभाऊ कराळे यांनी माती आणण्यासाठी ट्रॅक्टर व डिझेल सेवा उपलब्ध करून दिली तसेच गावातील शेकडो नागरिक आणि महिला यामध्ये सहभागी होऊन सक्रिय सहभाग दिला यामध्ये एकूण ५०० मीटर लांबीचा पांदण रस्ता दुरुस्ती करिता श्रमदान, लोकसभा मधून पूर्ण करण्यात आले यामुळे थेट शेतात बंडी तसेच ट्रॅक्टर थेट शेतापर्यंत घेऊन जाणे नागरिकांना सोयीचे झाले आहे या श्रमदानामध्ये गावचे सरपंच मा.श्री.राजू पाटील कराळे,उपसरपंच श्री.विजय दा.सगणे,सर्व ग्रामपंचायत सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी श्री.सुरजजी भोपसे साहेब,रोजगार सेवक श्री.उमेशभाऊ दहे,ग्रामपंचायत कर्मचारी श्री.उमेश गोरे,अंगणवाडी सेविका,गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# विद्यापीठ प्राधिकारिणींच्या कार्यकाळासंबंधी विसंगत कलम बदला

## व्यवस्थापन समिती सदस्य प्रा. डॉ. सिकची यांचे राज्यपालांना साकडे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

विद्यापीठांच्या विविध प्राधिकारिणींच्या कार्यकाळासंबंधीच्या नियमांमध्ये सुधारणा करण्याची मागणी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची यांनी केली आहे. त्यांनी यासंदर्भात सर्व विद्यापीठांचे कुलपती तथा राज्यपाल देवव्रत यांना साकडे घातले आहे. सध्याची तरतूद राज्यघटनेतील विविध तरतुदींशी विसंगत असून, यामुळे सदस्यांना पाच वर्षांचा पूर्ण कार्यकाळ मिळत नसल्याचे डॉ. सिकची यांचे म्हणणे आहे.

डॉ. सिकची यांनी आपल्या मागणीसाठी राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा-विधानसभा सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य आणि सहकार विभागातील विविध संस्थांच्या सदस्यांच्या कार्यकाळाचा दाखला दिला आहे. या सर्व लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ त्यांच्या विजयानंतर होणाऱ्या पहिल्या बैठकीपासून सुरू होऊन पुढील पाच वर्षांपर्यंत असतो. मात्र, विद्यापीठांच्या प्राधिकारिणींवरील सदस्यांचा कार्यकाळ निवडणुका कधीही झाल्या असल्या तरी, तो नेहमी १ सप्टेंबर ते पुढील वर्षी ३१ ऑगस्ट असाच गृहीत धरला जातो.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात सिनेट (अधीसभा), विद्वत सभा आणि व्यवस्थापन परिषद अशा तीन प्रमुख प्राधिकारिणी आहेत. विद्वत परिषद व सिनेटची निवडणूक स्वतंत्रपणे घेतली जाते. सिनेट ही मूळ प्राधिकारिणी असल्याने त्यातूनच व्यवस्थापन परिषदेवर सदस्य निवडले जातात. सन २०१६ च्या विद्यापीठ कायद्यातील कलम ६२ (१) अन्वये ही प्रक्रिया राबविली जाते. या अधिनियमानुसार, 'प्रत्येक प्राधिकरणाची मुदत १ सप्टेंबरपासून सुरू होईल आणि ती उक्त दिनांकापासून पुढील पाच वर्षे (३१ ऑगस्ट) इतकी असेल, मग तो सदस्य कोणत्याही दिनांकाला त्या पदावर आलेला असो.'

याउलट, इतर लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ त्या-त्या सभागृह किंवा प्राधिकारिणींच्या पहिल्या बैठकीपासून सुरू होतो. त्यामुळे विद्यापीठ कायद्यातील हे कलम राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांचे एकप्रकारे उल्लंघन असल्याचे डॉ. सिकची यांनी म्हटले आहे. या विसंगतीमुळे निवडून आलेल्या सदस्यांना त्यांच्या पदावर पूर्ण पाच वर्षांचा कालावधी मिळत नाही.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सध्याच्या अधिसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२२ रोजी मतदान होऊन २२ नोव्हेंबरला निकाल जाहीर झाला होता. त्यानंतर २४ नोव्हेंबरला अधिसूचना जारी करून अधिसभा अस्तित्वात आल्याची घोषणा करण्यात आली. मात्र, अधिसभेची पहिली बैठक १४ मार्च २०२३ रोजी घेण्यात आली. याच बैठकीत व्यवस्थापन परिषद सदस्यांची निवडणूक होऊन १७ एप्रिल २०२३ रोजी व्यवस्थापन परिषदेची पहिली बैठक झाली. तथापि, विद्यापीठ कायद्याच्या कलम ६२ (१) प्रमाणे या प्राधिकरणांची मुदत ३१ ऑगस्ट २०२७ रोजी संपणार आहे, म्हणजेच निवडून आलेल्या सदस्यांना त्यांच्या प्राधिकरणाच्या पहिल्या बैठकीपासून पाच वर्षांचा पूर्ण कालावधी मिळणार नाही. त्यामुळे यात सुधारणा करणे आवश्यक आहे.

# एचआयव्ही जनजागृतीची भव्य रॅली अमरावतीत उत्साहात

## २५०० विद्यार्थ्यांचा सहभाग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

जागतिक एड्स दिनानिमित्त अमरावतीमध्ये ४ डिसेंबर रोजी भव्य एचआयव्ही जनजागृती रॅली काढण्यात आली. महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा संचालक तसेच अतिरिक्त प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबईचे मा. डॉ. विनोद कंदेवाड यांच्या हस्ते जिल्हा सामान्य रुग्णालयातून हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात झाली.

या वेळी मार्गदर्शन करताना डॉ. कंदेवाड यांनी अमरावती जिल्ह्यातील घटता एचआयव्ही संसर्गदर कौतुकास्पद असल्याचे सांगितले. सर्वसमावेशक जनजागृती आणि युवकांचा सहभाग वाढला तर एचआयव्ही निर्मूलनाचे उद्दिष्ट साध्य करता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

या रॅलीत विविध शासकीय-अर्धशासकीय संस्था, वैद्यकीय व नर्सिंग महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि रेड रिबन क्लब यांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शहरातील विविध महाविद्यालयांतील २५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणांसह जनजागृतीचा संदेश दिला. जिल्हा सामान्य रुग्णालयातून निघालेली ही रॅली कॉटन मार्केट, जयस्तंभ, राजकमल, श्याम चौक मार्गे पुन्हा जिल्हा सामान्य येथे परतली.

समारोपप्रसंगी डॉ. सुशीलकुमार वाकचौरे, डॉ. प्रदीप निरवाणे, डॉ. संदीप हेडाऊ, डॉ. अमोल नरोटे आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे आदी मान्यवर उपस्थित होते.

रॅलीत उच्च जोखीम गटांसाठी कार्यरत संस्थांचे 'माहिती रथ' विशेष आकर्षण ठरले. स्थलांतरित कामगार, ट्रकचालक, तृतीयपंथी समुदाय, देहविक्री करणाऱ्या महिला आणि एचआयव्ही बाधितांसाठी उपलब्ध समुपदेशन, तपासणी व उपचार सेवांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच सामाजिक संस्थांनी सक्रिय सहकार्य केले. विशेष घटकातील महिलांनी साकारलेल्या रांगोळीचे सर्व मान्यवरांनी कौतुक केले.अमरावतीत दरवर्षी होणाऱ्या जनजागृती उपक्रमांमध्ये यंदाची रॅली सर्वाधिक भव्य, प्रभावी आणि सर्वसमावेशक ठरल्याचे सहभागी संस्थांनी नमूद केले.

# चैत्यभूमीकडे येणाऱ्या वाहनांना टोलमाफी द्या

## काँग्रेस खासदारांची नितीन गडकरी यांच्याकडे मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी, दादर येथे दाखल होणार्या लाखो अनुयायांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी ६ डिसेंबर रोजी मुंबईत येणार्या वाहनांना टोलमाफी देण्यात यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी केंद्रीय रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे काँग्रेस खासदारांनी बुधवारी दिल्लीत भेट घेऊन केली.

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी देशाच्या कानाकोपर्यातून अनुयायी मोठ्या संख्येने चैत्यभूमीवर दाखल होतात. त्यापैकी मोठा हिस्सा हा खाजगी वाहनाने किंवा प्रवासी वाहनाने लांबवरून मुंबईत येणार्यांचा असतो. मुंबईकडे येताना विविध ठिकाणी लागणार्या महामार्ग टोलमुळे अनुयायांवर आर्थिक भार पडतो. याच पृष्ठभूमीवर ६ डिसेंबरसाठी एकदिवसीय टोलमाफी जाहीर करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. सदर निवेदन देताना अमरावतीचे खा. बळवंत वानखडे, मुंबईच्या खा. वर्षा गायकवाड, खा. डॉ. कल्याण काळे, खा. डॉ. शिवाजी काळगे आणि खा. रवींद्र चव्हाण आदी उपस्थित होते. या मागणीला केंद्र सरकारने सकारात्मक प्रतिसाद देऊन बाबासाहेबांच्या अनुयायांच्या भावनांचा व अस्मितेचा मान राखावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# दर्यापुरात मतदानानंतर विजयाची गणिते जुळवण्यास सुरुवात

## नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी उमेदवारांमध्ये उत्सुकता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४दर्यापूर**

दर्यापूर नगरपरिषद निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान प्रक्रिया पार पडली. यानंतर नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांच्या उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले आहे. सध्या विविध पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते बुथनिहाय आकडेवारी गोळा करून मतदानाची गणिते जुळवण्यात व्यस्त आहेत.



निवडणूक आयोगाच्या जुन्या वेळापत्रकानुसार मतमोजणी आज, ३ डिसेंबर रोजी होणार होती. मात्र, ती ऐनवेळी २१ डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आल्याने उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी आपापले आडाखे बांधत आहेत.

विधानसभा निवडणुकीत काँग्रेस ज्या भागांमध्ये पिछाडीवर होती, त्या ठिकाणी यावेळी मतदानात वाढ करण्याचा प्रयत्न पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केला. या नगरपरिषद निवडणुकीत पारंपरिक मतदारही फोडण्याचे प्रयत्न झाल्याचे दिसून आले.

राजकीय पक्षांनी विजयाची गणिते जुळवताना विविध समाज, जाती-धर्मातील मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. त्यांना भविष्यातील विकासकामांची आश्वासनेही देण्यात आली होती. प्रत्येक पक्षाने काही ठिकाणी उघड प्रचार केला, तर काही ठिकाणी छुपा अजेंडा राबवत आपल्या उमेदवाराचे मतदान वाढवण्यावर लक्ष केंद्रित केले.

एकूण ३६ हजार ५७१ मतदारांपैकी २५ हजार ८०१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यंदा मतदार यादीत अनेक मतदारांची नावे दोन ते तीन मतदान केंद्रांवर असल्याने त्यांनी सोयीनुसार मतदान केले.


कुटुंबातील सदस्यांचे मतदान एकाच केंद्रात असणे अपेक्षित असताना, मतदार यादीतील त्रुटींमुळे पती एका मतदान केंद्रात तर पत्नी दुसऱ्या मतदान केंद्रात अशी परिस्थिती निर्माण झाली. यामुळे मतदारांची गैरसोय झाली.काही कार्यकर्त्यांकडून या निवडणुकीची तुलना गतवर्षीच्या विधानसभा निवडणुकीशी केली जात आहे. विधानसभेच्या तुलनेत नगरपरिषदेसाठी मतदारांनी वेगळी भूमिका घेतल्याची चर्चा आहे.

शहरातील हॉटेल्स, चौक आणि सार्वजनिक ठिकाणी सध्या मतदानाची गणिते जुळवली जात आहेत. कोणत्या प्रभागातून आघाडी मिळेल आणि कोणत्या प्रभागात पिछाडीवर राहू, यावर प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते चर्चा करत आहेत. विजय आपलाच होणार आणि गुलाल आपलाच उधळला जाणार, अशा दाव्यांमुळे सामान्य मतदारांमध्येही उत्सुकता वाढली आहे.

नगराध्यक्षपदासाठी सर्वच प्रमुख पक्षांकडून विजयाचे दावे केले जात आहेत. भाजप समर्थकांना दर्यापूर नगरपरिषदेत पुन्हा निवडून येण्याचा विश्वास आहे.

दुसरीकडे, काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष सुधाकर भारसाकळे यांच्या समर्थकांनुसार, यावेळी मतदार परिवर्तनाच्या बाजूने उभे राहिले आहेत. शिंदे गट शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडूनही विजयाचा दावा केला जात आहे.निवडणुकीतील बंडखोरी आणि घटलेल्या मतदानाच्या टक्केवारीचा कोणाला फटका बसेल, हे मात्र निकाल जाहीर झाल्यावरच स्पष्ट होईल.

# एमपीएससीची परीक्षा अन् मतमोजणी चक्क एकाच दिवशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

राज्यातील लाखो परीक्षार्थींच्या करिअरचा प्रश्न असलेली एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षा (गट-ब अराजपत्रित) आणि नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी या दोन्ही महत्त्वाच्या शासकीय प्रक्रिया एकाच दिवशी २१ डिसेंबर रोजी होणार आहे. या प्रकारामुळे राज्यभरातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात सुमारे पाच हजार २१ उमेदवार परीक्षा देणार आहेत. मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन मतमोजणीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतणार असल्याने परीक्षा केंद्रांची व्यवस्था, पोलिस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था आणि कर्मचारी उपलब्धता या सर्व बाबींवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अमरावती जिल्ह्यात नऊ नगरपालिका व दोन नगरपरिषदेची निवडणूक २ डिसेंबर रोजी पार पडली. ३ डिसेंबरलामतमोजणी होणार होती. मात्र ती मतमोजणी २१ डिसेंबरला होणार आहे. परंतु याच दिवशी एमपीएससीमार्फत घेण्यात येणारी पोलिस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक, सहायक कक्ष अधिकारी पदासाठी परीक्षा आयोजित केली आहे. राज्यातील लाखो विद्यार्थ्यांबरोबरच अमरावती मधील हजारो विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. शहरातील बहुतांश परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा आयोजित केली आहे. या दुहेरी शासकीय उपक्रमांमुळे परीक्षेचे नियोजन सुरळीतपणे पार पडेल की, परीक्षा पुढे ढकलली जाईल, याबाबत विद्यार्थी साशंक आहेत.

**परीक्षा पुढे ढकलली तर जाणार नाही ना !**

मागील काही वर्षाची स्थिती बघितली तर एमपीएससी परीक्षा वेळोवेळी पुढे ढकलल्या जात असल्याचा अनुभव विद्यार्थ्यांना आला आहे. या वेळेस देखील परीक्षा होईल की पुढे ढकलली जाईल, याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. आयोगाने याबाबत तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. एमपीएससीकडून मात्र यासंदर्भात अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण एमपीएससी साईटवर आले नसल्याचे दिसत आहे.

# एक आठवड्याच्या हिवाळी अधिवेशनाने विदर्भाचे प्रश्न सुटणार का?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नागपूर**

नागपुरात ८ डिसेंबरपासून होऊ घातलेले हिवाळी अधिवेशन फक्त एक आठवड्याचे असल्याचे जाहीर झाल्यानंतर विदर्भातील जनतेतून संताप व्यक्त होत आहे.

नागपूर करारानुसार हिवाळी अधिवेशन नागपुरात किमान सहा आठवडे चालावे, तसेच विदर्भाच्या प्रश्नांवर विस्तृत चर्चा व्हावी, अशी तरतूद आहे. पण, प्रत्यक्षात फक्त एका आठवड्याचे अधिवेशन घेऊन सरकार नागपूर कराराला तिलांजली देत आहे. फक्त एक आठवड्यात विदर्भातील सर्व प्रश्न सुटतील का, असा सवाल काँग्रेसचे गटनेते आ. विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. वडेट्टीवार म्हणाले, निवडणुकीचे कारण देऊन सरकार एक आठवड्यात अधिवेशन गुंडाळू पाहात आहे. असे अधिवेशन घेऊन विदर्भातील जनतेला काय संदेश देऊ इच्छिता. हिवाळी अधिवेशन फक्त औपचारिकता बनवत असेल तर मग अर्थसंकल्पीय अधिवेशन नागपुरात घेण्याची तयारी सरकार दाखवेल का, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.




**गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चाच नाही**

विदर्भातील शेतकरी प्रश्न, उद्योग क्षेत्राची अधोगती, सिंचन प्रकल्पांची अडचण, वाढत चाललेले बेरोजगारीचे प्रमाण, आरोग्य व शिक्षण यांसारख्या प्रश्नांवर विस्तृत चर्चा आवश्यक आहे. एका आठवड्याच्या अधिवेशनाने या गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चाच होणार नाही. अल्प कालावधीत काही विधेयके सभागृहात धावपळीत मंजूर करण्यापलीकडे काही शक्यच नाही, असा आरोप विरोधकांनी केला आहे.

**नागपूर करारानुसार अधिवेशन का नाही?**

१९५३ साली झालेल्या नागपूर करारात विदर्भाच्या विकासाच्या दृष्टीने विधानसभेचे किमान एक अधिवेशन नागपूर येथे घेण्याची तरतूद होती. केवळ प्रतिकात्मक सभा नव्हे, तर सहा आठवड्यांपेक्षा कमी कालावधी चालणार नाही, अशा स्पष्ट अटी करारात नमूद आहेत. परंतु, गेल्या काही वर्षात हा कालावधी सातत्याने कमी होत गेला. यंदा तर फक्त आठवडाभराचे अधिवेशन घेण्याची घोषणा झाली. मग नागपूर कराराची किंमत उरली तरी काय? असा संतप्त सवाल वैदर्भीय जनता उपस्थित करीत आहे.

**पूर्णवेळ अधिवेशनासाठी सरकार बांधील**

हिवाळी अधिवेशन हे नागपूर करारानुसार घेण्यासाठी सरकार बांधील आहे. विरोधी पक्षात असताना देवेंद्र फडणवीस सातत्याने महिनाभराच्या अधिवेशनासाठी आग्रही असायचे. आता मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना नागपूर करार मान्य नाही का, असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते अनिल देशमुख यांनी केला.

उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेल्या नगर परिषदेच्या निवडणुका २० डिसेंबरला होत आहे. त्यामुळे अर्धे आमदार अधिवेशनात येणारच नाहीत. मंत्रीही प्रचारात असतील. त्यामुळे फक्त सोपस्कार पार पाडण्यासाठी अधिवेशन होत आहे का? शेतकऱ्यांचा प्रश्न गंभीर झाला आहे. सरकार दखल घ्यायला तयार नाही. आचारसंहितेत एक आठवड्याचे अधिवेशन घेऊन सरकार पळवाटा शोधत आहे, अशी टीका देशमुख यांनी केली.

# चिखलदऱ्यात स्ट्रॉबेरीची गोड क्रांती अडचणीत; अनुदान बंद झाल्याने उत्पादक चिंतेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४चिखलदरा**

अमरावती जिल्ह्यातील पर्यटन नगरी आणि विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यात काही वर्षांपासून स्ट्रॉबेरीची लागवड मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. येथील हवामान अनुकूल असल्याने चिखलदऱ्यातील स्ट्रॉबेरी अत्यंत गोड, रसाळ आणि दर्जेदार तयार होत असल्याने पर्यटकांकडूनही याला मोठी मागणी आहे.



सुरुवातीला सरकारकडून स्ट्रॉबेरी लागवडीसाठी विशेष अनुदान मिळाल्याने शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळाले आणि उत्पादनात वाढ झाली; मात्र सध्या हे अनुदान बंद झाल्याने स्ट्रॉबेरी उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.उत्पादकांचे म्हणणे आहे की स्ट्रॉबेरी लागवडीचा खर्च इतर पिकांच्या तुलनेत जास्त आहे-नर्सरी रोपांची किंमत, सिंचन व्यवस्था, तणनियंत्रण, मल्चिंग, पॅकिंग तसेच मजुरी खर्च मोठ्या प्रमाणात वाढल्याने खर्चाची परतफेड करणे कठीण झाले आहे.परिणामी काही उत्पादक लागवड कमी करण्याचा किंवा बंद करण्याचा विचार करत आहेत. अनुदानाशिवाय स्ट्रॉबेरी लागवड परवडणारी राहिलेली नाही, सरकारने तातडीने अनुदान पुन्हा सुरू करावे, अशी मागणी स्ट्रॉबेरी उत्पादकांनी केली आहे.पर्यटन वाढीसाठीही या पिकाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याने स्थानिक नागरिक आणि उद्योजकांनीही सरकारने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# 'श्री गुरुदेव दत्त' नामाने दुमदुमली नृसिंहवाडी, दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४कोल्हापूर**

आज, गुरुवारी सर्वत्र मोठ्या भक्तिभावाने श्री दत्त जयंती सोहळा उत्साहात साजरा होत आहे. कोल्हापुरातील श्रीक्षेत्र नृसिंहवाडी श्री दत्त संप्रदायाची राजधानी म्हणून ओळखली जाते. श्री क्षेत्र नृसिंहवाडी येथे आज दत्त जयंती आणि मार्गशीर्ष महिन्यातील गुरुवारचा दुग्धशर्करा योग साधत भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. मध्यरात्रीपासूनच शिरोळ-कुरुंदवाड मार्गावरून हजारो भाविक 'श्री गुरुदेव दत्त' नामाचा जप करत नृसिंहवाडीत पायी चालत दाखल झाले. पहाटेपासून मंदिर परिसर दत्तमय नामाने दुमदुमून गेला आहे.




दत्तजयंती निमित्त महाराष्ट्रासह कर्नाटक, गोवा राज्यातून लाखो भाविक दर्शनासाठी नृसिंहवाडीत येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीनं प्रशासनाने नियोजन केले आहे. मंदिर परिसर, कृष्णा-पंचगंगा संगम घाट आणि गावात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मंदिरात गेल्या आठवड्याभर विविध धार्मिक कार्यक्रम सुरू आहेत. श्री दत्त जयंती उत्सवानिमित्त पहाटे काकड आरती, षोडशोपचार पूजा,पंचामृत अभिषेक, महापूजा यांसारखे धार्मिक विधी संपन्न झाले असून दुपारी साडेबारा वाजता श्रींच्या चरणकमलावर महापूजा व महाप्रसाद, दुपारी तीन वाजता ब्रह्मवृंदांकडून पवमान पंचसूक्तांचे पठण होईल.

दुपारी चारनंतर नारायणस्वामी महाराजांच्या मंदिरातील श्रींची उत्सवमूर्ती मुख्य मंदिरात आणण्यात येईल. सायंकाळी पाच वाजता दत्त जन्मकाळ होणार आहे. त्यानंतर पारंपरिक आरती, पाळणा होऊन सुंठवडा वाटण्यात येणार आहे. नऊनंतर धूप, दीप आरती व पालखी सोहळा झाल्यानंतर रात्री शेजारती होणार आहे. श्रींचा पाळणा जन्मकाळानंतर विनोद पुजारी यांच्या घरी दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

दत्त जयंतीनिमित्त मंदिर परिसरात आकर्षक अशी फुलांची सजावट करण्यात आली आहे. राज्यांतून लाखो भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे होणाऱ्या भाविकांच्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी शिरोळ पोलिसांनी एकेरी वाहतूक ठेवून बंदोबस्त तैनात केला आहे. दत्त जयंती निमित्त नृसिंहवाडी नगरी भक्तिमय वातावरणात न्हाऊन गेल्याचे पहायला मिळत आहे.

# विमान सेवेत गोंधळ : नागपूरातील सहा विमान उड्डाणे रद्द, प्रवाशांचे हाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नागपूर**

वैमानिकांची कमतरता, चेक-इन प्रणालीतील तांत्रिक बिघाड आणि इतर ऑपरेशनल समस्यांमुळे नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर किमान सहा ते सात उड्डाणे रद्द झाली, तर चारहून अधिक उड्डाणांना विलंब झाला. त्यामुळे प्रवाशांचे हाल झाले.देशभरातील विमानसेवा बुधवारी मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाली असून त्याचा फटका नागपूर विमानतळालाही मोठ्या प्रमाणात बसला.



गेल्या काही दिवसांपासून इंडिगो आणि इतर काही एअरलाइन्सच्या फ्लाइट ऑपरेशन्समध्ये सातत्याने विलंब होत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यातच बुधवारी संपूर्ण देशभर चेक-इन प्रणाली ठप्प झाल्याने शेकडो विमानांचे वेळापत्रक बिघडले. अनेक उड्डाणे रद्द करावी लागली, तर शंभरहून अधिक उड्डाणे तासन्तास विलंबाने धावपट्टीवरून उडाली.

नागपूर विमानतळावरही या बिघाडाचा थेट परिणाम झाला. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरकडे येणाऱ्या इंडिगोच्या ६ई २७३८ (मुंबई-नागपूर), ६ई ६७९८ व ६ई २४४७ (पुणे-नागपूर), ६ई ६८२० (दिल्ली-नागपूर), ६ई ६०९३ (पुणे-नागपूर) तसेच स्टार एअरच्या एस ५१९० (किशनगड-नागपूर) या उड्डाणांना रद्द करण्यात आले.तद्वतच नागपूरहून सुटणारी अनेक उड्डाणे देखील रद्द करण्यात आली. यामध्ये ६ई २७३९ (नागपूर-मुंबई), ६ई ६६५९ (नागपूर-पुणे), ६ई १५७ (नागपूर-दिल्ली), ६ई ८१२ (नागपूर-कोलकाता) तसेच स्टार एअरचे एस ५१९१ (नागपूर-किशनगड) या विमानांचा समावेश होता.

त्याशिवाय नागपूरहून सुटणाऱ्या अनेक फ्लाइट्स विलंबाने उडाल्या. इंडिगोचे ६ई ६९३४ (नागपूर-गोवा) एक तास, ६ई ४६२ (नागपूर-मुंबई) साडेतीन तास, ६ई ६८६४ (नागपूर-बेंगळुरू) ४९ मिनिटे, ६ई ६६२० (नागपूर-गोवा) सहा तास, ६ई ६६९७ (नागपूर-पुणे) एक तास, ६ई ६५९ (नागपूर-मुंबई) तीन तास, ६ई ७२७३ (नागपूर-इंदूर) एक तास, ६ई ६८९६ (नागपूर-बेंगळुरू) दीड तास, तर ६ई ६८०३ (नागपूर-बेंगळुरू) अडीच तास विलंबाने सुटली.

**दिलगिरी व्यक्त करून मोकळे**

या संपूर्ण गोंधळाबद्दल इंडिगो एअरलाइन्सने सार्वजनिकरीत्या माफी मागितली आहे. कंपनीने जारी केलेल्या पत्रकात मागील दोन दिवसांपासून नेटवर्कवर मोठ्या प्रमाणात ऑपरेशनल अडचणी येत असल्याचे मान्य केले आहे. त्यात तांत्रिक त्रुटी, हिवाळी हंगामाशी संबंधित वेळापत्रकातील बदल, वाढती हवाई वाहतूक, प्रतिकूल हवामान परिस्थिती आणि अद्ययावत क्रू रोस्टरिंग नियम (फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन्स) यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

# कामगार आयुक्त कार्यालयात प्रहार जनशक्ती पार्टीचे ठिय्या आंदोलन, कार्यालय घेतले ताब्यात

## निर्णय मिळेपर्यंत कार्यालय न सोडण्याचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने आज कामगार आयुक्त कार्यालयात तीव्र आंदोलन छेडण्यात आले. जुन्या शासन निर्णयानुसार सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी प्रहार कार्यकर्त्यांनी कार्यालयात धडक देत थेट ठिय्या मांडला. आंदोलकांनी कार्यालय ताब्यात घेत, जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत कार्यालय सोडणार नाही, असा इशारा अधिकाऱ्यांना दिला.दरम्यान, आज घेण्यात आलेल्या सुरक्षा रक्षक चाचणीत अनेक सुरक्षा



रक्षकांना अनपेक्षितरीत्या नापास करण्यात आल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. या प्रकारामुळे शेकडो सुरक्षा रक्षक संतप्त झाले असून प्रहार जनशक्ती पार्टीचे कार्यकर्ते त्यांच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने कार्यालयात दाखल झाले.आंदोलकांनी जुन्या जीआरनुसारच सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करावी, चाचणीत झालेल्या अनियमिततेची चौकशी करावी आणि कामगारांना न्याय मिळावा, अशी मागणी केली. जोवर मागण्या मान्य होणार नाही तोवर आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा इशारा आंदोलनांनी दिला.

# अं. सुर्जी निवडणूक ढकलल्याला निर्णय अधिकारी जबाबदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद निवडणुकीस अवघे काही तास बाकी असतानाच निवडणूक पुढे ढकलण्याची वेळ आली असून, याला सर्वस्वी निवडणूक निर्णय अधिकारी राजेश्वर हांडे जबाबदार असल्याचा आरोप एम आय एमचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विनीत डोगरदिवे यांनी केला आहे. त्यांनी जिल्हाधिकारी तसेच निवडणूक आयोगाकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निर्णय अधिकाऱ्यांनी सुरुवातीपासूनच मनमानी निर्णय घेत उमेदवारांवर अनावश्यक नियमांची सक्ती केली. या निर्णयांविरोधात काही उमेदवारांना न्यायालयात धाव घ्यावी लागली व न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकालही दिला. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेत गंभीर त्रुटी झाल्याचे स्पष्ट झाले आहे.आगामी निवडणूक पारदर्शक व्हावी व मतदारांचा विश्वास अबाधित राहावा यासाठी सदर निर्णय अधिकारींचा पदभार तात्काळ काढून इतर अधिकारी नेमावेत, अशी मागणी विनीत डोगरदिवे यांनी केली आहे.

# विजयाची गोळाबेरीज करण्यात उमेदवार व्यस्त

## नगरपालिका निवडणूक : कार्यकर्त्यांकडून घेतला जातोय बूथनिहाय आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

जिल्ह्यातील ९ नगरपालिका २ ग्रामपंचायतसाठी २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया घेण्यात आली. यादरम्यान काही उमेदवारांनी मतदान केंद्रांवर जाऊन आढावा घेतला, तर काही उमेदवारांनी मात्र घरी बसूनच कार्यकर्ते, समर्थकांकडून आढावा घेणे पसंत केले. आता मतदानाची शेवटची टक्केवारी हाती आल्यानंतर उमेदवार विजयाची गोळाबेरीज केली जात आहे.

निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर रोजी आचारसंहिता लागू केल्यानंतर प्रशासन आणि स्थानिक निवडणूक विभागाने जलद गतीने तयारी सुरू केली होती.

इच्छुक उमेदवारांनीही आपापल्या परीने जनसंपर्क, प्रचार मोहीम, घरोघरी भेटी आणि सोशल मीडियावरील प्रचाराला वेग दिला होता. प्रभागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. मतदान पार पडल्याने आता सर्वांचे लक्ष मतमोजणी केंद्रांकडे लागले आहे. मतदान टक्केवारीचा तपशील मिळाल्यानंतर उमेदवारांनी कार्यकर्त्यांसोबत बूथनिहाय बैठका घेत मतांचे गणित मांडण्यास सुरुवात केली आहे. कोणत्या बूथमध्ये आघाडी मिळू शकते, कुठे प्रचारात कमी



पडलो, कोणत्या पॅनलमध्ये चुरस वाढली आहे. याचा सखोल आढावा उमेदवार घेत आहेत.काही प्रभागांत तिढा निर्माण झाल्याने निकाल अधिक रोचक ठरणार आहेत, तर काही ठिकाणी सरळ लढतीमुळे मतदारांचा कल स्पष्ट दिसत असल्याचा दावा उमेदवार करत आहेत. निकालाच्या काही दिवसांपूर्वीच सुरु झालेली अंकगणिती धावपळ ही उमेदवारांच्या तळपायी भुई थरवरवणारी ठरत आहे. अखेर मतदारांनी दिलेला कौल कोणाच्या बाजूने झुकतो, याची उत्सुकता चांगलीच वाढली आहे. तुर्तास मात्र चर्चांना उधाण आहे.

**बूथनिहाय आकडेमोड सुरू**

मतदान प्रक्रियेनंतर आता उमेदवारांचे लक्ष 'विजयाचे गणित जुळविण्याकडे वळले आहे. मतदान शांततेत पार पडले असले तरी मतदानाची टक्केवारी पुढे येताच प्रत्येक उमेदवाराने आपापल्या मत क्षेत्रातील शक्यतांचा अंदाज बांधण्यास सुरुवात केली आहे. प्रमुख पक्षांसह अपक्षांकडूनही बूथनिहाय मतदान टक्केवारीचा आढावा घेत आकडेमोड सुरू केली आहे.

**उमेदवारांनी घेतला मतदानाचा आढावा**

नगरपालिकेसाठीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान काही उमेदवारांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून आढावा घेणे पसंत केले, तसेव नागरिकांच्या चर्चावर लक्ष देण्याचे सांगण्यात आले. यादरम्यान नेमके कुठे कमी पडत आहे आणि कुठे पुढे आहे, याचाही आढावा घेण्याचे समर्थकांना सांगण्यात आले.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत